बुधवार, ५ ऑक्टोबर २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक ७८
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


## दसरा मेळाव्यानिमित्त आज मुंबईत तोफा धडाडणार



**मुंबई :** शिवसेनेच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गट आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे गट यांचा दसरा मेळावा अनुक्रमे बीकेसी मैदान आणि शिवाजी पार्कवर बुधवारी (दि. ५) होणार आहे. यानिमित्ताने तोफा धडाडणार आहेत. शिवसेनेतून उठाव केल्यानंतर शिंदे गटाचा हा पहिलाच दसरा मेळावा आहे. त्यामुळे या मेळाव्यासाठी शिंदे गटाने जय्यत तयारी केली आहे. मेळाव्यासाठी ४०० बाय १२०० फूटांचा मंच तयार करण्यात आला आहे. शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या भाषणाचे जुने व्हिडीओ मंचावर दाखविले जाणार आहेत. या वेळी ५१ फुटी तलवारीचे शस्त्रपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होईल. या मेळाव्याला होणारी गर्दी लक्षात घेऊन बीकेसी मैदानात एलईडी स्क्रीनचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

## अंतरंग


चौकमध्ये आमदार महेश बालदींचा झंझावाती दौरा/२
कसळखंड परिसरात ‘सीसीटीव्ही’ची नजर/६
पालीचे डम्पिंग ग्राउंड समस्यांच्या गर्तेत/७


# स्वच्छ सर्वेक्षणात पनवेल महापालिकेची ‘टॉप फाईव्ह’ कामगिरी

## राज्यात पाचवा, तर देशात १७वा क्रमांक ▮ कचरामुक्त शहरांसाठीचे थ्री स्टार, हागणदारीमुक्त शहराचा ओडीएफ++ दर्जाही प्राप्त

**पनवेल : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या स्वच्छ सर्वेक्षण २०२२ स्पर्धेत १ ते १० लाख लोकसंख्येच्या गटात राज्य पातळीवर ३४ शहरांमध्ये पनवेल महानगरपालिकेने पाचवा, तर देश पातळीवर ३८२ शहरांमध्ये १७वा क्रमांक पटकाविला आहे. याचबरोबर कचरामुक्त शहरांसाठीचे थ्री स्टार व हागणदारीमुक्त शहराचा ओडीएफ++ दर्जा प्राप्त झाला आहे.

पनवेल महापालिकेने यंदा स्वच्छ सर्वेक्षणात आपल्या क्षेत्रात विविध नाविन्यपूर्ण संकल्पना राबविल्या. तत्कालीन महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता आणि पर्यावरण रक्षण व संवर्धनाचे संदेश प्रसारित करणारी चित्रे भिंतीवर काढण्यात आली तसेच तलावांची स्वच्छता करण्यात आली होती. विविध टाकाऊ वस्तूंचे रिड्युस, रियुझ, रिसायकलाचा प्रचार व प्रसार करण्याकरिता प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

महापालिका कार्यक्षेत्रात स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत चित्रकला, पोस्टर जिंगल, गाणी, व्हिडीओ, शॉर्टफिल्म, पथनाट्य, भित्तीचित्र स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे



स्वच्छ सोसायटी, स्वच्छ हॉटेल, स्वच्छ शाळा-महाविद्यालय, स्वच्छ प्रशासकीय कार्यालये स्पर्धा घेण्यात आल्या. नागरिकांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन स्वच्छताविषयक जनजागृतीमध्ये आपला सहभाग नोंदविला.

महापालिकेच्या वतीने घनकचरा व्यवस्थापनविषयक विविध उपक्रम राबविले गेले. त्यामध्ये लोकसहभागावर भर देण्यात आला. या अनुषंगाने नागरिकांना त्यांच्या विविध सभा, समारंभ थ्रीआर संकल्पनेनुसार साजरे करण्याचे आवाहन आयुक्तांनी केले आहे. त्यास नागरिकांचा प्रतिसाद लाभला. विविध सोसायट्यांमध्ये कचरा विलगीकरणाचे महत्त्व सांगून कंपोस्ट खत तयार करण्याच्या कार्यशाळा घेण्यात आल्या.

नगरसेवक-नगरसेविका, स्वच्छता विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, विभाग प्रमुख अनिल कोकरे यांच्यासह स्वच्छता निरीक्षक, कर्मचारीवृंद व स्वच्छतामित्रांनी केलेले काम आणि त्याला नागरिकांचा लाभलेला सकारात्मक प्रतिसाद यामुळेच पनवेल महापालिकेस स्वच्छतेचा हा बहुमान प्राप्त झालेला आहे.

यापुढेही नागरिकांनी महापालिका क्षेत्र कचरामुक्त राहावे यासाठी शासनाने सांगितलेल्या नियमांचे पालन नागरिकांनी करावे, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

# भाजप हे शक्तीचे दुसरे रूप

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन



माथेरानमधील सामाजिक कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे सक्षम नेतृत्व आणि पक्षाच्या माध्यमातून होत असलेल्या विकासकामांवर प्रभावित होऊन माथेरानमधील सामाजिक कार्यकर्त्यांनी मंगळवारी (दि. ४) भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. पनवेल येथील मध्यवर्ती पक्ष कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रवेशकर्त्यांचे शाल देऊन स्वागत केले. देशात भाजप हे शक्तीचे दुसरे रूप बनले आहे, असे प्रतिपादन त्यांनी या वेळी केले.

या पक्षप्रवेश कार्यक्रमास भाजपचे कर्जत तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर, माथेरान शहर उपाध्यक्ष किरण चौधरी, सरचिटणीस राजेश चौधरी, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, माजी नगरसेवक चंद्रकांत जाधव, राकेश चौधरी, प्रदीप घावरे, आदिवासी मोर्चा तालुका अध्यक्ष संदीप कदम, उद्योजक दीपक शहा, ज्येष्ठ नेते अरविंद शेलार आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## राज्यातील जनतेला सरकारची दिवाळी भेट

### रेशनकार्डधारकांना मिळणार १०० रुपयांत शिधा वस्तू

**मुंबई : प्रतिनिधी**

दिवाळीच्या निमित्ताने राज्यातील शिधापत्रिकाधारकांना शिधा वस्तूंचे दिवाळी पॅकेज केवळ १०० रुपयांत देण्याचा निर्णय मंगळवारी (दि. ४) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या संचामध्ये प्रत्येक शिधापत्रिकाधारकाला प्रती एक किलोच्या परिमाणात रवा, चणाडाळ, साखर व एक लिटर पामतेल मिळेल.

राज्यातील एक कोटी ७० लाख कुटुंबांना म्हणजेच सुमारे सात कोटी लोकांना याचा प्रत्यक्ष लाभ होणार आहे. हा संच एक महिन्याच्या कालावधीकरिता देण्यात येऊन त्याचे वितरण ई-पॉस प्रणालीद्वारे करण्यात येणार आहे.

## अनिल देशमुखांना ११ महिन्यांनंतर जामीन मंजूर, तरीही सुटका नाही!

**मुंबई : प्रतिनिधी**

आर्थिक अफरातफर (मनी लॉण्डरिंग) आणि १०० कोटी रुपयांच्या वसुली प्रकरणात माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना मंगळवारी (दि. ४) मुंबई उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर करण्यात आला. सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दाखल केलेल्या गुन्ह्याच्या प्रकरणात ११ महिने गजाआड राहिल्यानंतर देशमुखांना जामीन मिळाला तरी अद्याप सीबीआयच्या गुन्ह्यात जामीन मिळाला नसल्याने देशमुख यांची तुरूंगातून सुटका होणार नाही.

### संजय राऊतांचा दसराही तुरूंगातच

**मुंबई :** पत्राचाळ जमीन गैरव्यवहारप्रकरणी अटकेत असणारे शिवसेना खासदार संजय राऊत यांना दसराही तुरूंगातच घालवावा लागणार आहे. राऊतांच्या न्यायालयीन कोठडीत १० ऑक्टोबरपर्यंत वाढ करण्यात आली आहे. सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) ३१ जुलै रोजी संजय राऊत यांना अटक केली होती.

## राणी इंगोले ठरल्या साडीच्या मानकरी

**नवरात्रोत्सवानिमित्ताने दै. रामप्रहर आणि द्वारकादास शामकुमार, पनवेल (महाराष्ट्राचे महावस्त्र दालन, लग्न बस्त्याचे माहेरघर) यांच्या वतीने महिला वाचकांना साडी जिंकण्याची सुवर्णसंधी देण्यात आली होती. देवीच्या दहा हातांमध्ये काय काय असते असा प्रश्न ‘रामप्रहर’मधून विचारण्यात आला होता. त्याचे आठ महिलांनी अचूक उत्तर दिले. यातून लकी ड्रॉद्वारे राणी इंगोले (कल्याण) या भाग्यवान महिला ठरल्या आहेत. त्यांना दसऱ्याच्या दिवशी (बुधवार, दि. ५) ‘रामप्रहर’ कार्यालयात सायं. ६ वा. साडी देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. याशिवाय भारती भगत (पनवेल), मनीषा जगताप (कामोठे), जुहिली ठाकूर (दिघाटी), शकुंतला ठाकूर (दिघाटी), प्राजक्ता गणगणे (पुणे वाघोली), रूपाली खोडसे (कळंबोली), साक्षी पाटील, प्रमिला यांनीही अचूक उत्तरे दिली होती. त्यांचेही अभिनंदन!**










# खालापुरात ग्रामपंचायतीची रणधुमाळी

## आमदार महेश बालदी यांचा चौकमध्ये झंझावाती दौरा



**खालापूर : प्रतिनिधी**

खालापुरातील चौक, तुपगांव, लोधीवली, आसरे या चार ग्रामपंचायतींमध्ये १६ ऑक्टोबरला निवडणूक होत असून तालुक्यातील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या चौक ग्रामपंचायतीमध्ये भारतीय जनता पक्ष व शिवसेना महाविकास आघाडी अशी सरळ लढत होणार आहे. भारतीय जनता पक्षाने प्रचारात आघाडी घेतली असून चौकमध्ये वरचढ असल्याचे सिद्ध केले आहे. त्या अनुषंगाने उरण-खालापूरचे आमदार महेश बालदी यांनी चौक ग्रामपंचायतीत दौरा केला.

आमदार महेश बालदी यांच्या विकास निधीतून चौक गावात विकासाची गंगा वाहणार आहे. विकास कामातून चौकचे रुपडे पालटण्याचा संकल्प भाजपतर्फे करण्यात आला आहे. चौक ग्रामपंचायतीसाठी भारतीय जनता पक्षाच्या थेट सरपंच पदाच्या उमेदवार गायत्री गणेश कदम या निवडणूक रिंगणात उतरलेल्या आहेत. सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील दांडगा अनुभव गायत्री गणेश कदम यांना विजयश्री खेचून आणण्यास उपयोगी ठरेल, अशी चर्चा आहे.

चौक ग्रामपंचायतीमधील १५-२० वर्षांची अराजकता उलथून टाकण्याचा चंग भाजपाने बांधला असून कार्यसम्राट लोकप्रिय आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष रामदास ठोंबरे व माजी सरपंच गणेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली एक झंजावात निर्माण झाला आहे. आमदार महेश बालदी यांनी दसरा सणाच्या अगोदर सोमवारी संध्याकाळी चौक बाजारपेठेत विविध मान्यवरांच्या भेटी गाठी घेऊन, त्यांच्या अडीअडचणी समजावून घेतल्या तर यापुढे चौक ग्रामपंचायत कारभार भाजपच्या हातात द्या आम्ही चौकला सुजलाम सुफलाम करू असा विश्वास मतदारांना दिला. दरम्यान प्रभाग ३मध्ये रिपब्लिक पार्टी ऑफ इंडियाचे तालुकाध्यक्ष महेंद्र धनगांवकर यांची त्यांच्या निवासस्थानी आमदार महेश बालदी, भारतीय जनता पक्ष खालापूर तालुकाध्यक्ष रामदास ठोंबरे, गणेश कदम, नंदू सोनवणे व भाजप कार्यकर्त्यांनी भेट घेऊन भाजपला मतदान करण्याचे आवाहन केले. या वेळी चौकमधील दलित समाजाचे तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आपत्ती व्यवस्थापन कामांसाठी सरकारी कंपन्यांना नेमणार

**मुंबई : प्रतिनिधी**

आपत्ती व्यवस्थापनातील प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र किंवा राज्य सरकारच्या कंपन्यांना प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नेमण्याचा निर्णय मंगळवारी (दि. ४) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या कंपन्यांना मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य कार्यकारी समितीकडून प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा म्हणून टर्न की तत्त्वावर नेमण्यात येईल. या कंपन्यांना नियुक्त करण्यासाठी स्वारस्य अभिव्यक्ती जाहिरातदेखील प्रसिद्ध करण्यात येईल. या कंपन्यांसमवेत सामजंस्य करार करण्यात येऊन त्यांना थेट नियुक्तीने कामे देण्यात येणार आहेत.

दरम्यान, मंत्रिमंडळ बैठकीत अन्य महत्त्वपूर्ण निर्णयही घेण्यात आले, ज्याचा लाभ राज्यातील नागरिकांना होणार आहे.

# भाजपच्या सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेत श्री गणेश मित्र मंडळ प्रथम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप सांस्कृतिक सेलच्या वतीने सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा २०२२ आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा पारितोषक वितरण सभारंभ सोमवारी (दि. ३) श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडल क्लास हौसिंग सोसायटीच्या वतीने झंकार नवरात्रोत्सवात जाहीर करण्यात आला. स्पर्धेत प्रथम क्रमांक टपाल नाका येथील श्री गणेश मित्र मंडळ, द्वितीय क्रमांक स्वराज्य सार्वजनीक गणेशोत्सव मिरची गल्ली तसेच तृतीय क्रमांक खारघर सेक्टर १२ येथील खारघरचा राजा यांने पटकावला.

उत्तरजनार्थ पारितोषक श्री युवा मित्र मंडळ कामोठे सेक्टर ३४, तसेच सर्वोत्कृष्ट मूर्तिकार-नवनाथ मागलरुलकर भिंगारी यांच्या साई श्रद्धा मित्र मंडळाला व सर्वोत्कृष्ट देखावा चित्रकार पुरस्कार कोस्तुभ साळवी यांनी साकारलेल्या अभिनव युवक मित्र मंडळाला मिळाला आहे. सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषके देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, अजय बहिरा, समीर ठाकूर, दर्शना भोईर, सांस्कृतीक सेलचे अध्यक्ष अभिषेक पटवर्धन, प्रशांत झुंजारराव, सुमीत झुंजारराव, विजय पाटील, गणेश जगताप, सपना पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते. दरम्यान या वेळी महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला.

# मनोहर पाटील हळव्या मनाचे निसर्ग कवी -दशरथदादा पाटील



**ठाणे : प्रतिनिधी**

मनोहर पाटील हे हळव्या मनाचे कवी होते. त्यांचे बालपण खेडेगावात निसर्गाच्या वातावरणात गेले, त्या निसर्गाशी एकरुप होऊन त्यांनी आपलं काव्य लेखन केलं. त्यामुळे ते निसर्ग कवी होते असे प्रतिपादन शेतकरी नेते दशरथदादा पाटील यांनी येथे केले.

दर्पण प्रकाशनातर्फे कवी मनोहर पाटील यांच्या निसर्ग संवाद या कविता संग्रहाचे प्रकाशन कवी अरुण म्हात्रे यांच्या हस्ते रविवारी खारीगाव, कळवा येथील साने गुरूजी वाचनालयाच्या सभागृहात करण्यात आले. त्या समारंभाच्या अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून अर्थतज्ज्ञ जे. डी.तांडेल, आगरी दर्पणचे संपादक व दर्पण प्रकाशनचे व्यवस्थापकीय संचालक दीपक म्हात्रे, अखिल आगरी समाज परिषदेचे उपाध्यक्ष मधुकर भोईर उपस्थित होते.

अर्थतज्ज्ञ जे. डी. तांडेल यांनीही मनोहर पाटील यांच्या कवितांचा गौरव केला. कृष्णाजी दामोदर पाटील यांनी कवी मनोहर पाटील यांच्या काव्यदृष्टीची पार्श्वभूमी सांगताना आम्ही निसर्ग आणि जिव्हाळ्याच्या माणसांमध्येच वाढलो असल्याचे सांगितले. डॉ. प्राची नंदकिशोर पाटील, प्रज्ञा माळवदे, निलिमा प्रशांत कदम आणि कांचन पालांडे यांनी मनोहर पाटील यांच्या कवितांचे वाचन केले. भंडणकर यांनी अंजली पाटील यांचे भाषण वाचून दाखविले. प्रारंभी दर्पण प्रकाशनाचे संचालक दीपक म्हात्रे यांनी आपल्या प्रास्ताविकात मनोहर पाटील यांनी दोन वर्षांपूर्वी या कविता आमच्याकडे दिल्या, परंतु कोविडने निर्माण केलेल्या परिस्थितीमुळे त्यावेळी त्यांचा हा संग्रह प्रकाशीत होऊ शकला नाही, पण त्याची अपूरी इच्छा त्यांच्या कुटुंबियांनी आज पूर्ण केली. यासाठी त्यांचे चिरंजीव योगेश पाटील यांचे तसेच या संग्रहाला प्रस्तावना देणारे कवी अरूण म्हात्रे यांचे परिश्रम मोलाचे असल्याचे सांगितले.

### माजी नगरसेवक राजू सोनी यांचा मदतीचा हात

**पनवेल : वार्ताहर**

महानगरपालिकेचे माजी नगरसेवक राजू सोनी यांनी तत्परतेने पेव्हर ब्लॉक बसवून तेथील अडचण दूर केली आहे.

शहरातील कै. एस. आर. जोशी मेमोरियल ट्रस्ट तर्फे चालविण्यात येत असलेल्या पाणपोईच्या आजूबाजूला पावसाचे पाणी साचत होते. ही गोष्ट राजू सोनी यांच्या निदर्शनास आणून देताच तातडीने पेव्हर ब्लॉक बसवून तेथील समस्या निकाली काढल्याने स्थानिक नागरिकांसह ट्रस्टतर्फे त्यांचे आभार मानण्यात आले आहे.



### रामशेठ ठाकूर महाविद्यालयात गटचर्चा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात सोमवारी (दि. ३) व्यवसाय संघटनेच्या मार्फत गटचर्चाचे आयोजन करण्यात आले. या गटचर्चेमध्ये महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागातील सुमारे ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन त्यांचे विचार दिलेल्या विषयावर प्रकट केले.

या गट चर्चेचा फायदा सर्व विद्यार्थ्यांना होणार आहे, कारण विद्यार्थ्यांमध्ये असणारे सादरीकरण, कौशल्य संभाषण, तसेच व्यासपीठ धाडस विकसित होणार आहे. प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व गट चर्चेसाठी प्रोत्साहन दिले. आयोजन व्यवसाय संघटनेचे समन्वयक प्रा. नम्रता गजरा व डॉ. महादेव चव्हाण यांनी केले व प्रा. राहुल कांबळे प्रा. नम्रता परीक व डॉ. अविनाश धुमारे यांनी सहकार्य केले.

या गटचर्चासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



# गव्हाण विद्यालयात 'रयत'चा वर्धापन दिन



**गव्हाण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज मध्ये रयत शिक्षण संस्थेचा १०३ वा शतकोत्तर त्रैवार्षिक वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

पनवेल पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील शालेय पोषण आहार विभागाचे अधिक्षक आणि पनवेल पंचायत समितीचे माजी गटशिक्षणाधिकारी महेश श्रीरंग खामकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कर्मवीर अण्णा व सौ. वहिनींच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. या वेळी विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या व रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, तारा येथील हायस्कूलचे उपप्राचार्य जे. के. म्हात्रे, विद्यालयाचे गुरूकुल प्रमुख संदिप भोईर, विद्यालयाच्या शालेय पोषण आहार विभागाचे उपप्रमुख एकनाथ ठाकूर, शिक्षक पालक संघाचे सचिव देवेंद्र म्हात्रे, प्रसिद्धी प्रमुख सागर रंधवे, कला विभाग प्रमुख गणेश भोईर, ग्रंथपाल महेश म्हात्रे, सेवक दयानंद खारकर व अन्य उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, निबंध आणि वक्तृत्व अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य ज्योत्स्ना ठाकूर यांनी दिली.

### खारघर येथे आज विजयादशमी सोहळा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राहुल शिक्षण प्रसारक मंडळाच्या विद्यमाने नवी मुंबईतील खारघर सेक्टर७मधील सत्याग्रह महाविद्यालयात ६६व्या अशोका विजयादशमी धम्म चक्र प्रर्वतन दिन सोहळ्याचे आयोजन बुधवारी (दि. ५) रोजी सकाळी ११ वाजता संस्थेचे संस्थापक संचालक कोंडीबाजी संभाजीराव डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या सोहळ्याला डॉ. प्रवीण सूर्यवंशी, प्रा. सुनीता वानखेडे -गवई हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून नवी मुंबईतील बौद्ध धर्मिय नागरिक, शाळा, महाविद्यालय, होस्टेल, संशोधन संस्थेतील सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी धार्मिक सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी केले आहे.

### दुखवटा

## अनुसया मांडवकर



**पनवेल** : नेरे येथील अनुसया काशिनाथ मांडवकर यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८४ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, नातवडे, पंतवडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिवारावर शोककळा पसरली आहे.


**TENDER NOTICE**

**REDEVELOPMENT**

Sealed tenders are invited from Reputed & Capable Developers / Builders for Redevelopment of

**MAULI DARSHAN CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD.**

(Regn. No RGD/PWL/HSG./(TC)/1133/98 Date: 07/12/1998)
Plot No. 665 B Mahatma Phule Road, Panvel, Raigad 410 206,
**AREA OF PLOT - : 1102.60 SQ MTS.**
**NO OF MEMBERS - : 32 (23 Flat & 9 Shop)**

**The Society is holding all the powers for Redevelopment.**

Tender documents are available at : Project Management Consultant's (PMC) office at:

**UNIQUE SOLUTIONS**

**Shop No. 01, Rajhans Chs Ltd, Opp. Saraswat Bank, S.N. Road Panvel 410 206**
**Mobile No. 9920075676**
**Email - usolutions2@gmail.com**

(Timing 11.00 am to 5.00 pm)
(Sunday Closed)

**Cost of Tender Form: Rs. 5900/- (Rs. 5000 + 18% GST)**

**(Non Refundable)**

by Cash / Pay order / D.D only Payable at Panvel, in the Name of

**UNIQUE SOLUTIONS**

**Date of Issue Of tender document: 06/10/2022**

**Last Date of Submission : 20/10/2022 Up to 5.00 PM.**


पान १ वरून

### भाजप हे शक्तीचे दुसरे रूप

या वेळी योगेश मधुकर जमदाडे, प्रतीक मनोज कासूरडे, ओमकार कृष्णा रांजाणे, किरण नारायण चौधरी, शैलेश मधुकर जमदाडे, मकरंद मनोहर रांजाणे, राहुल रमेश चौधरी, मयूर रमेश चौधरी, कुंदन मंगेश परदेशी, सौरभ प्रदीप घावरे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यांचे उपस्थित मान्यवरांनी पक्षाची शाल देऊन स्वागत केले.

भाजप असाध्य ते साध्य करण्याचा प्रयत्न सातत्याने करीत आहे. त्यामुळे भाजपची शाल अंगावर टाकली गेल्याचा तुम्हाला अभिमान वाटेल. पक्षाची ताकद तुमच्या पाठीशी सदैव राहील, असे सांगून सेवा पंधरवड्यानिमित्त पक्षाच्या वतीने राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात दिली. आपल्याला सर्व नागरिकांपर्यंत भाजपने केलेल्या विकासकामांची माहिती पोहचवून त्यांना आणखी काय पाहिजे याची माहिती घ्यायला पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

### विजय आर्मी स्कूलमध्ये वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विजय आर्मी स्कूल चिखले येथे अठरावा वर्धापन दिनासह महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून प्राचार्य एम. के. मराठे होते. प्रास्ताविकात ज्येष्ठ शिक्षक व्ही. जे. साळुंखे यांनी सैनिकी शाळा स्थापनेपासूनचा सविस्तर इतिहास व प्रवास सांगितला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्यांनी संस्था अध्यक्ष नानासाहेब यांचा कार्याचा आढावा घेतला. ऍक्टिव्ह कमांडर पीव्हीआर कृष्णन कमांडट व्हीएएस कार्याचा गुणगौरव मराठे यांनी केला. विद्यार्थ्यांना महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या कार्याविषयी माहिती नेरुळकर मॅडम यांनी दिली. व्ही. के. ठाकरे यांनी आभार मानले. त्यानंतर सामूहिक गरबा नृत्य झाले. सूत्रसंचालन डी. टी पाटील यांनी केले.







**पनवेल : कुत्तरपाडा ओम अष्टविनायक नवरात्र उत्सव मंडळ हरिगाम केवाळे येथे भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दर्शन घेतले. या वेळी ओबीसी सेल रायगड जिल्हा अध्यक्ष एकनाथ देशेकर, वसंत आदईकर, कमलाकर पाटील, भाऊ साठे, अध्यक्ष राजाराम काळे, दादासाहेब शेळके, विश्वास म्हात्रे, स्वप्नील निकम, सामाजिक कार्यकर्ते पोलीस पाटील रवींद्र पाटील, सचिन सावंत, प्रवीण भोसले आदी उपस्थित होते.**



**पनवेल : राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये अभिवादन करण्यात आले. या वेळी विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य व 'रयत'च्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी, रवींद्र भोईर, शिक्षक पालक संघाचे सचिव देवेंद्र म्हात्रे, उपशिक्षक सागर रंधवे, ग्रंथपाल महेश म्हात्रे, अरुण कोळी आदी उपस्थित होते.**

# उदे गं अंबे उदे!

## भाजप नेते परेश ठाकूर यांची पनवेल परिसरातील नवरात्रोत्सवांना भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील सार्वजनिक नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. त्या अनुषंगाने शिवाजी नगर, कोपर, कामोठे, खारघर या ठिकाणी सार्वजनिक नवरात्रोत्सवाला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत देवीचे मनोभावे दर्शन घेतले. त्यांचे आयोजकांच्या वतीने या वेळी स्वागत करण्यात आले.

परेश ठाकूर यांनी यांनी कामोठे येथे सुषमा पाटील विद्यालय व ज्युनियर कॉलेज, एकता मित्र मंडळ सेक्टर ३४ गणपती चौक, कामोठे शहर सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळ, रास गरबा महोत्सव, गोपीनाथ भगत सामाजिक विकास मंडळ, शिवमंदिर नवरात्री मंडळ सेक्टर १२ आणि हॅप्पी सिंग युवा मित्र मंडळांना भेट देत देवीचे मनोभावे दर्शन घेतले.

या देवी दर्शनावेळी पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, भाजप कामोठे शहर अध्यक्ष रवी जोशी, विकास घरत, गोपीनाथ भगत, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, कामोठे शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, जिल्हा उपाध्यक्ष के. के. म्हात्रे, युवा नेते हॅप्पी सिंग, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, नितेश पाटील, के. के. म्हात्रे आदी उपस्थित होते.








## कामगारांच्या वारसांना ग्रॅज्युटी

### जय भारतीय जनरल कामगार संघटनेला यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विष्कर इन्फ्रास्ट्रक्चर (आयओटीएल धुतूम) च्या सेवानिवृत्त व मयत कामगारांच्या वारसांना जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या प्रयत्नामुळे सेवा उपदान (ग्रॅज्युटी) मिळवून दिल्याबद्दल कामगार प्रतिनिधींनी कामगार नेते जितेंद्र घरत यांचे आभार मानले.

उरण तालुक्यातील धुतूम येथे असलेल्या आय.ओ.टी.एल अंतर्गत विष्कर इन्फास्ट्रक्चर या ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कामगारांचा सेवा उपदानाचा (ग्रॅज्युटी) प्रश्न प्रलंबित होता. वारंवार ठेकेदार बदलत असल्यामुळे कामगार सेवानिवृत्त झाला किंवा एखादा कामगार मयत झाल्यास त्या कामगारांना सेवा उपदान कोणी द्यायचा हा प्रश्न गेले कित्येक वर्ष प्रलंबित होता, पण जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे सल्लागार आमदार प्रशांत ठाकूर व अध्यक्ष जितेंद्र घरत यांनी प्रमुख मालक आयओटीएलचे व्यवस्थापन अधिकारी मिलिंद मोघे यांच्यासोबत चर्चा करून सदर सर्व कामगारांना त्यांचा सेवा उपदान मिळावा यासाठी आग्रह धरला, त्यानंतर प्रमुख मालक, व्यवस्थापनाने सदरची मागणी मान्य करून सेवा निवृत्त झालेले कामगार कृष्णा आत्माराम पाटील, सदाशिव भरत ठाकूर, विकास धनंजय ठाकूर, हरिश्चंद्र राजाराम घरत, अर्जुन पोशा ठाकूर, बबन नानोसा संकपाळ यांना तर मयत कामगार प्रविण शंकर ठाकूर, श्याम यशवंत घरत यांच्या वारसदारांना सेवा उपदान देण्यात आले.

या वेळी कामगार प्रतिनिधी शशिकांत ठाकूर, अर्जुन ठाकूर, ज्ञानेश्वर ठाकूर, चंद्रकांत कद्दू, बबन संकपाळ, तसेच संघटनेचे सचिव रवींद्र कोरडे उपस्थित होते. महत्त्वपूर्ण अशा या चर्चेमुळे कामगारांना न्याय मिळवून देण्यात यशस्वी झाले असून निवृत्त कामगार तसेच मृत कामगारांच्या वारसांनी आमदार प्रशांत ठाकूर, कामगार नेते जितेंद्र घरत यांचे आभार मानले.




**खारघर : श्री कच्छ कडवा पाटीदार समाज व पाटीदार समाज युवक मंडळ आयोजित नवरात्रोत्सवात पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी उपस्थित राहून सर्वांना शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप शहर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक प्रवीण पाटील, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहर उपाध्यक्ष शुभ पाटील, युवा नेते नितेश अभिमन्यू पाटील, कच्छ वागड लेवा पाटीदार समाज प्रमुख प्रवीण पटेल, सौराष्ट्र पटेल मित्र मंडळ प्रमुख रमेश सोरठिया, श्री कच्छ कडवा पाटीदार समाज युवक मंडळ प्रमुख अल्पेश पोकार, पाटीदार समाज युवा मंडळ अध्यक्ष अल्पेश पटेल, सरचिटणीस सुनील ठकरानी, उपप्रमुख राजेश छभैया, उपप्रमुख पंकज धोलू आदी उपस्थित होते.**



**पनवेल : दुर्गा माता मित्र मंडळ दिघाटी येथे आमदार महेश बालदी यांचे स्वीय सहाय्यक प्रवीण काळबागे, माजी उपसरपंच दत्तात्रेय पाटील, ताराचे माजी उपसरपंच विद्याधर जोशी, कैलास पाटील, विकास पाटील आदींनी भेट देऊन देवीचे दर्शन घेतले.**

देवी दर्शन




**कळंबोली : नवरात्रीच्या नवव्या दिवशी महोदर गावात आई गावदेवी मंदिरात आईचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उत्सवाला भाजप ओबीसी सेल जिल्हा अध्यक्ष एकनाथ देशेकर यांची उपस्थिती लाभली. या उत्सवासाठी शिरवली ग्रामपंचायतीचे सदस्य लक्ष्मण शंकर पाटील, माजी उपसरपंच भाईदास बामा शिनारे, युवा नेते वसंत अनंत भगत, भाऊ साठे, कमलाकर पाटील, अनंता पाटील, एकनाथ हिंदोळा, रमेश पारधी, तुकाराम शांताराम शिनारे, सुभाष भगत, चंद्रकांत भगत, काळूराम पाटील आदींनी मेहनत घेतली.**

## माजगावमधील ग्रामस्थांचा भाजपमध्ये प्रवेश



**पनवेल, खालापूर : रामप्रहर वृत्त**

खालापूर तालुक्यातील माजगाव पौद येथील आदिवासी ग्रामस्थांनी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. यामध्ये माजगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच मथुराबाई मधुकर वाघे, मधुकर वाघे, बाबू जाधव, काशिनाथ वाघे, धोंडू वाघे, मोतीराम वाघे, गोविंद वाघे, राम लहानू वाघे, महादू वाघे, राम गोविंद वाघे, कमलाकर वाघे, भास्कर वाघे, बाळाराम वाघे, मदन वाघे व त्यांच्या समर्थकांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. या वेळी आमदार महेश बालदी, खालापूर तालुकाध्यक्ष रामदास ठोंबरे, सरपंच गोपीनाथ जाधव, उपसरपंच तसेच भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले.

## उत्पन्नाच्या दाखल्यासाठी रेशन कार्डचा अडथळा दूर

**पनवेल : वार्ताहर**

उत्पन्नाच्या दाखल्यासाठी रेशन कार्ड बंधनकारक करण्यात आले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रवेश, रुग्णांसाठी वैद्यकीय योजना तसेच कर्ज मंजुरीसाठी अडथळे निर्माण होत होते, मात्र शिवसेना शिंदे गटाकडून याबाबतचे एक निवेदन तहसीलदारांना देण्यात आल्यानंतर हा अडथळा दूर झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

तहसीलदार कार्यालयाकडून वेगवेगळ्या प्रकारचे दाखले दिले जातात. त्यामध्ये उत्पन्नाचा दाखलाही मिळतो. विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याकरिता तसेच शिष्यवृत्तीसाठीसुद्धा उत्पन्नाच्या दाखल्याची गरज आहे. उत्पन्नाच्या दाखल्यासाठी रेशन कार्ड बंधनकारक केल्यामुळे अनेकांची शिधापत्रिका ही मूळ गावी असल्याने तर काहीजण मुंबई येथून पनवेलला स्थलांतरित झाल्यामुळे मुंबईतच रेशन कार्ड असल्याने अडचणींचा सामना करावा लागत होता. या संदर्भात माजी नगरसेवक शिवाजी थोरवे यांच्याकडे अनेक तक्रारी आल्या होत्या. याच पार्श्वभूमीवर शिवसेनेचे पनवेल जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, तालुकाप्रमुख रूपेश ठोंबरे, शिवाजी थोरवे यांच्या शिष्टमंडळाने पनवेल तहसीलदारांना निवेदन सादर केले होते.

## पळस्पे येथे माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पळस्पे येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या इयत्ता दहावीच्या १९९१ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात झाला. या स्नेहमेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून गणेश वर्तक, टी. एस. पाटील, जी. बी. पाटील, जे. एन. पाटील आणि कुलकर्णी यांची उपस्थिती लाभली.

या स्नेहमेळाव्यासाठी पन्नासहून अधिक विद्यार्थी जमले होते. आपण ज्या शाळेत शिकलो त्या शाळेसाठी आपणही काहीतरी देणे लागतो या भावनेतून येणाऱ्या काळामध्ये आर्थिक मदत करण्याचे एकमताने ठरले.

स्नेहमेळावा यशस्वी होण्यासाठी सुनील गवंडी, अभय गावंड, राजेश हुद्दार, ज्ञानेश्वर पाटील, गणेश शेळके, चंद्रकांत भगत, सुनील कोतुळकर, सुरेश आव्हाड यांनी मेहनत घेतली.



## सिडकोच्या महागृहनिर्माण योजनेतील अर्ज नोंदणीस ३ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाच्या ४,१५८ घरांच्या ऑगस्ट-२०२२ महागृहनिर्माण योजनेकरिता ऑनलाइन अर्ज नोंदणी करण्यासाठी, ३ नोव्हेंबर २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय सिडकोने घेतला असून या अनुषंगाने अनामत रक्कम व शुल्क भरणा, संगणकीय सोडत या प्रक्रियांनाही मुदतवाढ देण्यात आली आहे. या योजनेकरिता अर्ज करण्यास ३ ऑक्टोबर ही अंतिम तारीख होती, परंतु अधिकाधिक नागरिकांना योजनेचा लाभ घेता यावा, याकरिता ऑनलाइन अर्ज नोंदणीस ३ नोव्हेंबरपर्यंत मुदंतवाढ देण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. सिडकोच्या विविध गृहनिर्माण योजनांतील वाणिज्यिक गाळ्यांच्या आणि नवी मुंबईतील रेल्वे स्थानक संकुलांतील वाणिज्यिक जागांच्या विक्री योजनेकरिता ऑनलाइन अर्ज करण्यासही ९ नोव्हेंबर २०२२पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या योजनेकरिता अर्ज नोंदणी करण्यास ६ ऑक्टोबर ही अंतिम तारीख होती.

सुधारित वेळापत्रकाप्रमाणे ऑनलाइन अर्ज नोंदणी ३ नोव्हेंबर २०२२पर्यंत करता येणार आहे. ऑनलाइन अर्ज ४ नोव्हेंबर २०२२ पर्यंत सादर करता येणार आहेत. ऑनलाइन शुल्क भरणा ०७ नोव्हेंबर २०२२पर्यंत करता येणार आहे. स्वीकृत अर्जदारांची प्रारुप यादी १४ नोव्हेंबर २०२२ रोजी तर स्वीकृत अर्जदारांची अंतिम यादी १८ नोव्हेंबर २०२२ रोजी सिडकोच्या https://lottery.cidcoindia.com/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. योजनेची संगणकीय सोडत २२ नोव्हेंबर २०२२ रोजी होणार आहे. सिडको गृहनिर्माण संकुलांतील वाणिज्यिक गाळे आणि रेल्वे स्थानक संकुलांतील वाणिज्यिक जागांच्या विक्री योजनेकरिता ऑनलाइन अर्ज, अनामत रक्कम व प्रक्रिया शुल्क भरणा ९ नोव्हेंबरपर्यंत करता येणार आहे. बंद निविदा ८ नोव्हेंबरपर्यंत सादर करता येणार आहेत. ई-लिलाव ९ नोव्हेंबर रोजी पार पडून ११ नोव्हेंबर २०२२ रोजी निकाल घोषित करण्यात येणार आहे.






**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या वतीने आयोजित झंकार नवरात्रोत्सवास वर्षा प्रशांत ठाकूर आणि कलर्स मराठी वाहिनीवरील श्री स्वामी समर्थ मालिका फेम विजया बाबर यांनी भेट दिली. दरम्यान, नवरात्रोत्सवाच्या आठव्या दिवशी माजी उपमहापौर चारुशीला घरत यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ झाला. या वेळी माजी नगरसेवक समीर ठाकूर तसेच विकी शेंडगे, निखिल ठक्कर, राहुल सिंग, प्रवीण मोरबाळ, शहाजी शिंदे, दर्शन ठाकूर, रूपेश नागवेकर, निखिल सोनी, दीपक सारीस, किरण मनोरे, शैलेश पाटील, किशोर मोरे, जयेश ठाकूर, अश्विनी जोशी, युटूबर रोशन भोईर आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# काश्मीर : पेच कायम?

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने काश्मीर खोऱ्यामधील दहशतवाद आटोक्यात आणून तेथे शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने सुरुवातीपासूनच प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. जम्मू आणि काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील कलम ३७० रद्द करण्याचा निर्णय हे त्याच दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल होते. सरकार निष्ठेने प्रयत्न करीत असतानाच तेथील दहशतवादी शक्ती मात्र अधूनमधून डोके वर काढतच असतात हे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या काश्मीर दौऱ्यादरम्यान पुन्हा एकदा समोर आले आहे.

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे सोमवारपासून तीन दिवसांच्या काश्मीर दौऱ्यावर असून मंगळवारी शारदीय नवरात्रीच्या नवव्या दिवशी त्यांनी वैष्णोदेवीचे दर्शन घेतले. भूतलावरील नंदनवन मानल्या जाणाऱ्या काश्मीर खोऱ्यात शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी केंद्रातील मोदी सरकारने अगदी प्रारंभीपासून प्रामाणिक प्रयत्न चालवले आहेत. त्याला अनुसरूनच या राज्याची विकासाच्या आणि प्रगतीच्या मार्गावर वाटचाल व्हावी याकरिता शहा यांनी वैष्णोदेवीकडे प्रार्थना केली. वास्तवत: शहा यांच्या दौऱ्यादरम्यान खोऱ्यातील दहशतवादी घातपाती कारवाया घडवून आणू शकतात, असा इशारा तेथील पोलीस महासंचालकांनी आधीच दिला होता. त्या पार्श्वभूमीवर शहा यांच्या दौऱ्यादरम्यान राज्यात कडेकोट सुरक्षा बंदोबस्त करण्यात आला असताना काश्मीरच्या तुरुंग विभागाचे महासंचालक हेमंतकुमार लोहिया यांची सोमवारी रात्री त्यांच्या निवासस्थानी अतिशय निर्घृण पद्धतीने हत्या करण्यात आल्याचे समोर आले. अर्थातच केंद्रीय गृहमंत्री काश्मीरच्या दौऱ्यावर आलेले असताना करण्यात आलेल्या या हत्येचे दहशतवादाशी संबंध असण्याची दाट शक्यता असून त्यादिशेने तातडीने तपास सुरू करण्यात आला आहे. ही हत्या त्यांच्या निवासस्थानी राहणाऱ्या एका नोकराने केली असावी असा संशय आल्याने पळून गेलेल्या संबंधित नोकराला पोलिसांनी वेगाने हालचाली करून ताब्यातही घेतले व त्याची चौकशी सुरू करण्यात आली आहे, परंतु काश्मीरमधील हिंसाचाराचे आव्हान पुरते संपुष्टात आलेले नाही. हे याच नव्हे तर याआधीच्या अन्य. हिंसक घटनांमधूनही दिसून आले आहे. तीन वर्षांपूर्वी अमित शहा यांनीच मोठ्या हिंमतीने लोकसभेत विशेष विधेयक मांडले आणि काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम रद्द करवून घेतले. त्याचवेळेस जम्मू आणि काश्मीरचे दोन स्वतंत्र केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभाजनही करण्यात आले होते. या महत्त्वपूर्ण घडामोडींच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने केलेल्या प्रभावी उपाययोजनांमुळे तेथे बराच काळ दगडफेकीसारखे हिंसक प्रकार बऱ्यापैकी आटोक्यात आले होते. पाठोपाठ शाळा सुरू झाल्या तसेच थोड्याफार प्रमाणात हिंदू पंडित कुटुंबेही आपल्या मूळ राज्यात परतूही लागली. तेथील पर्यटन व्यवसायही कोविडचे आव्हान मागे टाकून हळूहळू पुन्हा उभारी घेताना दिसू लागला, परंतु एकीकडे केंद्र सरकारच्या प्रयत्नांतून हे सकारात्मक बदल घडत असतानाच दहशतवादी शक्तीही पूर्णपणे हार मानण्यास तयार नव्हत्या. अलिकडच्या काळात तेथे काही पंडितांच्या, खोऱ्यात येऊन काम करणाऱ्या हिंदूंच्या हत्या झाल्याच्या बातम्या समोर आल्या. अमित शहा यांनी मंगळवारी राजौरी येथील सभेत म्हटल्याप्रमाणे केंद्र सरकारने तेथील तरुणांच्या हातात दगडांऐवजी लॅपटॉप देण्याचे प्रयत्न जोमाने चालवले आहेत. काश्मीरात उद्योगव्यवसायांना बळकटी देण्याचे सरकारचे प्रयत्न एकीकडे सुरू असतानाच दहशतवादाचा पेच मात्र पूर्णपणे सुटलेला नाही असेच अलिकडच्या हिंसक घटनांवरून दुर्दैवाने अधोरेखित झाले आहे.**

# ज्येष्ठ नागरिकांना हवाय कायद्याचा आधार!





**खबरबात**
**नितीन देशमुख**

ज्येष्ठ नागरिक दिन १ ऑक्टोबरला आपण साजरा केला. आपण त्यांचा सोबत फोटो काढून सोशल मिडियावर टाकून आपल्याला त्यांच्याबद्दल किती आदर, प्रेम आहे हे दाखवून देतो, पण प्रत्यक्षात हा सगळा देखावा असल्याचे वाढत्या वृद्धाश्रमांच्या संख्येवरून दिसून येत आहे. वर्तमानपत्रात आणि सोशल मिडियावरही ज्येष्ठ नागरिकांच्या छळाच्या किंवा त्यांना दिलेल्या वागणुकीसंबंधीच्या बातम्या वाचून लक्षात येते. त्यामुळेच ज्येष्ठ नागरिक कायदा निरुपयोगी ठरतो आहे असेच म्हणावे लागते.

आता लवकरच मुलांच्या परीक्षा संपतील मग पुढचा कालावधी म्हणजे दिवाळीच्या सुट्टीची मजा घेण्याचा. आपल्या सहलीचे बेत ठरवताना घरातील ज्येष्ठ नागरिकांची तरूण पिढीला अडचण वाटायला लागते. त्यामुळे त्यांना शारीरिक आणि मानसिक त्रास देण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत असतात. त्यांची वृद्धाश्रमात सोय करणे आर्थिकदृष्ट्या शक्य असतानाही उच्च शिक्षित भागात असे प्रकार घडत असतात. शासनाने ज्येष्ठ नागरिकांचा सांभाळ न करणाऱ्या मुलांना शिक्षा होण्यासाठी कायदा केला. या कायद्याची भीती कोणाला वाटत नसल्याचे दिसून येत आहे. आपल्या मुलासाठी शेवटी आई–वडिल सगळे विसरून आपली तक्रार मागे घेतात. त्यामुळे या कायद्याखाली शिक्षा होण्याचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते.

उच्चशिक्षित आणि उच्चवर्गीय महिला आणि पुरुष ज्येष्ठ नागरिकांना शारीरिक आणि मानसिक त्रास देताना अश्लील बोलताताच, पण त्यांना मारहाण करण्यापर्यंत त्यांची मजल जाते. आई–वडिलांवरून वाद झाल्यास तरुण पिढी विभक्त होण्याची टोकाची भूमिकाही घेताना दिसत आहेत. यावरून मदर्स डे हा सेल्फी काढून त्याचे फोटो सोशल मिडियावर टाकण्यापुरताच असतो हे लक्षात येते. त्यामुळे आजची तरुण पिढी कोठे चालली आहे? असा प्रश्न पडत आहे

भारतीय संस्कृतीत एकत्र कुटुंबपद्धती होती. एकाच कुटुंबात तीन ते चार पिढ्यांतील माणसे गुण्यागोविंदाने नांदत होती. घरात सुसंस्कारित वातावरण असे. छोट्या मुलांवर आजोबा– आजीकडून सुसंस्कार रुजविले जात असत. सर्वांना घरचे जेवण मिळत असे. आध्यात्मिक वातावरणात ज्येष्ठ मंडळी रात्रीच्या वेळी रामायण–महाभारतातील, शिवाजी महाराजांच्या कथा सांगून त्यांच्या मनावर भारतीय संस्कार बिंबवित असत. त्यातून संघटितपणे, प्रेमाने राहायची शिकवण मिळत असे. कुटुंबांचा विस्तार झाला, कामधंदा, नोकरीच्या निमित्ताने तरुणांना अन्यत्र जावे लागल्याने एकत्र कुटुंबपद्धतीला तडा गेला. आता क्वचितच अशी कुटुंबे पाहायला मिळतात. नोकरीधंद्यानिमित्त मुलाबाळांना शहरात, परराज्यात जावे लागल्याने मोठमोठी राजवाड्यासारखी घरे मोडकळीला आली आहेत. काही घरांत वयोवृद्ध माणसे तेवढी पाहायला मिळतात.विदेशांत स्थायिक झालेल्या मुलांना आपल्या आईवडिलांची काळजी घेण्यास वेळ नसतो.

आपल्या देशात २०११च्या शिरगणतीनुसार ७६ दशलक्ष लोक ६० वर्षे व त्यावरील वयाचे आहेत, तर ८० व त्यावरील वयाचे सहा दशलक्ष लोक आहेत. २०५० साली ही ६० वर्षे वयोमानातील लोकसंख्या ३२४ दशलक्ष बनेल, तर ८० व त्याहून अधिक वयाची लोकसंख्या ४८ दशलक्ष असेल. भारतीय संस्कृतीत 'मातृदेवो भव, पितृदेवो भव' ही शिकवण देण्याची गरज भासते. ज्येष्ठांना धनाची, पैशाची आवश्यकता नसते. त्यांना हवे असते प्रेम आणि आपुलकी. माणुसकीची भावना लुप्त होत चालली आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांची कुचंबना होत आहे. प्रेमाने चौकशी करणारे कोणी जवळ नसते. उतारवयात सुख व समाधान नसते. ते मिळवून देण्याचा प्रयत्न करायला हवा. त्यासाठी घरोघरी भारतीय संस्कृतीची शिकवण देण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

आर्थिक सुबत्ता, वैज्ञानिक संशोधन, आधुनिक उपचार पद्धती यामुळे वयोमर्यादा वाढली आहे, त्यामुळे समाजात ज्येष्ठ नागरिकांची संख्यादेखील वाढली आहे, पण वाढत्या संख्येने ज्येष्ठ नागरिकांच्या अनेक समस्यांनाही जन्म दिला आहे. या समस्यांचेही अनेक पैलू आहेत. आर्थिक, सामाजिक, शारीरिक आणि मानसिक अशा स्वरूपाच्या या समस्या असतात. वार्धक्यामुळे शरीर जीर्ण झालेले असते आणि त्यातच शारीरिक व्याधी मागे लागतात. शारीरिक व्याधींसाठी वैद्यकीय उपचारांची गरज असते, पण बाकी समस्यांसाठी समुपदेशन प्रभावी ठरू शकते. दोन पिढ्यांतील अंतर व त्यातून निर्माण होणारे ताणतणाव याचा सामना दोन्ही पिढ्यांना करावा लागतो आहे. मध्यमवर्ग आणि उच्च मध्यमवर्गात चंगळवाद आणि स्वकेंद्रीपणा पराकोटीचा वाढला आहे. त्यामुळे कुटुंब एकत्र राहत असले तरीही 'मी' माझे एवढेच पाहिले जाते. प्रत्येक वेळी स्वत:चा विचार केला जातो. ही वृत्ती संयुक्त कुटुंबासाठी घातक असते. यातून मग पुढे वृद्धांना मानसिक आणि सामाजिक समस्यांना तोंड द्यावं लागतं.

आपल्या वृद्ध आई–वडिलांकडे दुर्लक्ष करणारी हीच पिढी आज आपल्या वडिलांनी कष्ट करून मिळवलेल्या प्रॉपर्टीसाठी किंवा त्यांच्या जमिनीच्या तुकड्यासाठी आपसात भांडताना दिसते. प्रसंगी त्यावरून खून करण्यापर्यंत त्यांची मजल जाते. ज्या वडिलांनी कष्ट करून प्रसंगी पोटाला चिमटा घेऊन ती संपत्ती कमावली, त्यांना गरज असताना वृद्धाश्रमात ठेऊन हात झटकतात त्याबद्दल त्यांना ना खंत, ना खेद! त्यांच्या अनुभवाचा फायदा घेण्याचा प्रयत्न कधी केलाच जात नाही. अशा वेळी पनवेल तालुक्यातील दातार इंस्टीट्यूटचे संजय दातार दरवर्षी रायगड जिल्ह्यातील वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना आपल्या दातार इंस्टीटच्यूटमध्ये आणून त्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करून त्यांच्या सोबत सहकुटुंब एक दिवस घालवतात त्यांच्यासोबत खेळ, गाणी अशा कार्यक्रमानंतर जेवण करतात. त्यावेळी संजय दातारांसारखा माणूस आपली संस्कृती टिकून असल्याची खात्री पटवतो.

आपल्या राज्यात ज्येष्ठ नागरीकांसाठी धोरण जाहीर केले. त्याबाबत चर्चा करण्यासाठी तत्कालीन सामाजिक न्यायमंत्र्यांनी बोलावलेल्या बैठकीस केवळ तीन खात्याचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्या बैठकीत दिलेलेल्या आदेशांची फक्त गृहखात्यानेच दखल घेतल्याचे दिसून आले. या बैठकीत ज्येष्ठ नागरिकांच्या वतीने दारिद्र्य रेषेखालील ज्येष्ठांना मिळणाऱ्या निवृत्तीवेतनाची रक्कम वाढवावी, त्यांना सामाजिक सुरक्षितता मिळावी या दृष्टीने २००७च्या कुटुंब कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यात यावी. अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी ज्येष्ठांकडून करण्यात आली होती. त्यावर चर्चा करण्यात आली, पण सर्वाधिक प्रश्न एसटी आणि आरोग्य या विभागाशी निगडीत असताना त्या खात्याचे अधिकारी उपस्थित नव्हते.

सामाजिक न्यायमंत्र्यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या सार्वजनिक कार्यक्रमासाठी महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद यांनी आपल्या शाळा, उद्याने आठवड्यातून एकदा विनामूल्य उपलब्ध करून द्याव्यात असे सूचित केले होते. त्यांच्यावर कुटुंबातून होणाऱ्या अत्याचारात वाढ होत असल्याने कुटुंबात त्यांचा सन्मान राखावा. यासाठी शालेय विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात संस्कारक्षम गोष्टींचा समावेश करण्याची सूचना शालेय विभागाला देण्याचे आश्वासन दिले होते. मंत्रालयात ज्येष्ठांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी उपसचिव दर्जाचा अधिकारी नियुक्त करण्याचे ठरले, पण नंतर त्याची अंमलबजावणी करण्यासाठी कोणतीही पाऊले उचलेली दिसत नाहीत.



## बदलते तंत्रज्ञान

# लॅपटॉपवरील 'या' शॉर्टकट की करतील काम सोपे

आजकाल लॅपटॉपचा वापर कार्यालयीन काम, इंटरनेट ब्राउझिंग तसेच ऑनलाइन अभ्यास आणि सोशल मीडिया स्क्रोलिंगसाठी केला जात आहे. अशा परिस्थितीत लॅपटॉपचा कीबोर्ड नीट जाणून घेतल्यास तुमचा बराच वेळ वाचू शकतो. कीबोर्ड शॉर्टकटच्या मदतीने तुम्ही लॅपटॉपवरील काम सोपे आणि मजेदार करू शकता.

**विंडो + अल्ट + आर** : विंडोजसोबत येणाऱ्या उत्कृष्ट शॉर्टकटपैकी हा एक आहे. या शॉर्टकटच्या मदतीने लॅपटॉपची स्क्रीन रेकॉर्ड करता येते. या शॉर्टकट की एकाच वेळी दाबल्यानंतर, तुमच्या लॅपटॉपचे स्क्रीन रेकॉर्डिंग सुरू होईल. तुम्हाला तुमच्या लॅपटॉपची स्क्रीन रेकॉर्ड करायची असल्यास, स्क्रीन रेकॉर्डिंगसाठी तुम्हाला एकाच वेळी विंडो + अल्ट + आर बटणे दाबावी लागतील. यानंतर तुमच्या लॅपटॉपचे स्क्रीन रेकॉर्डिंग सुरू होईल.



**विंडो + डी** : या शॉर्टकट कीच्या मदतीने लॅपटॉपमध्ये चालणारी विंडो एकाच वेळी कमी करता येते. जेव्हा तुम्ही एकाच वेळी अनेक विंडो उघडून काम करत असाल आणि तुम्हाला होम स्क्रीनवर स्विच करावे लागेल तेव्हा हा शॉर्टकट सर्वात उपयुक्त आहे. तुम्ही विंडो + डी ऐवजी विंडो + एम२ देखील वापरू शकता.

**विंडो + एल** : सुरक्षिततेच्या दृष्टीने ही अतिशय उपयुक्त शॉर्टकट की आहे. त्याच्या मदतीने सिस्टम लॉक केली जाऊ शकते. म्हणजेच, तुमचा पीसी तुमच्या पासवर्डने पुन्हा उघडेल. या फीचरचा सर्वाधिक फायदा म्हणजे जेव्हा तुम्ही ऑफिसमध्ये काम करत असाल आणि तुम्हाला दुपारच्या जेवणासाठी किंवा इतर कोणत्याही कामासाठी बाहेर जावे लागते, तेव्हा अशा परिस्थितीत तुम्ही विंडो + एल शॉर्टकट की वापरू शकता. यामुळे तुमचा पीसी लगेच लॉक होईल.

**शिफ्ट + कन्ट्रोल + टी** : हा शॉर्टकट गुगल क्रोमसाठी सर्वात उपयुक्त शॉर्टकट आहे. त्याच्या मदतीने, हटवलेले टॅब देखील परत आणले जाऊ शकतात. काही वेळा आपण घाईघाईने आवश्यक असलेले टॅबही बंद करतो, मग त्या लिंकवर जाण्यासाठी हिस्ट्रीची मदत घ्यावी लागते. तुम्ही हे शिफ्ट + कन्ट्रोल + टी शॉर्टकट की वापरूनदेखील करू शकता.

# स्फुर्तीदायी, प्रेरणादायक श्री दुर्गामाता दौड

**निमित्त**



स्फुर्ती, प्रेरणादायक, नसानसांत देशभक्ती, धर्मभक्ती व स्वातंत्र्यभक्ती बिंबवणारा कार्यक्रम म्हणजेच श्री दुर्गामाता दौड!

हजारो वर्षांपासून संपूर्ण हिंदुस्तानात घरोघरी नवरात्रोत्सव उत्साहात साजरा केला जातो.. पोरा–बाळांचा संसार सुखाचा समाधानाचा व्हावा यासाठी दुर्गामातेचा आशीर्वाद मागण्याची पद्धती, आपण पाळत आहोत. पुण्यश्लोक जिजामातांनीही प्रतिवर्ष नवरात्र बसविले असेल पण त्यांनी, तुळजाभवानी जवळ, स्वतःच्या संसारासाठी नव्हे वा भोसले वंशासाठी नव्हे तर, कन्याकुमारी ते काश्मीर पसरलेला भारतमातेचा उद्ध्वस्त संसार दुरुस्त करण्यासाठी आशीर्वाद मागितले असतील. भोसल्यांच्य घरातील नवरात्र हे त्यांच्या कुटुंबासाठी नव्हते, तर साऱ्या हिंदू समाजाच्या संसारासाठी होते.

आपणही पुण्यश्लोक जिजामातांच्या व श्री शिवछत्रपतिंचा उदात्त भाव अंतः करणात धारण करुन, प्रत्येक वर्षी नवरात्रात, दुर्गामातेच्या पायाशी साऱ्या भारतमातेच्या उद्ध्वस्त होत चाललेल्या संसाराला दुरुस्त करण्यासाठी, आशीर्वाद मागण्याची प्रथा पत्करली पाहिजे! स्फूर्ती व प्रेरणादायक, नसानसांत देशभक्ती, धर्मभक्ती व स्वातंत्रभक्ती बिंबवणारा कार्यक्रम म्हणजेच श्री दुर्गामाता दौड.

श्री शिवछात्रपतिंच्या उण्यापुऱ्या ५० वर्षांच्या आयुष्यात त्यांनी देव, देश, धर्म यासाठी मुसलमान सत्ताधीशांशी शेकडो रणसंग्राम केले. क्षणाचाही विसावा न घेता केवळ हिंदूधर्म व हिंदुसमाजासाठी श्री शिवछत्रपति अखंड दौडले, लढले, झगडले. त्यांच्या रक्तातील आग, रग, धग, लढाऊपणा आजच्या तरुण पिढीच्या रक्तात येणे अत्यंत आवश्यक आहे.

म्हणून नवरात्रात प्रत्येक दिवशी पहाटे शेकडो तरुणांनी एकत्र यायचे, फेटे बांधा किंवा पांढऱ्या टोप्या घाला, पण उघड्या डोक्याने दौड काढायची नाही. ज्या ठिकाणी महाराजांची मूर्ती असेल तेथे एकत्र यायचं किंवा ज्याठिकाणी तुम्हाला सुरुवात करणे सुकर होईल अशा जागी एकत्र यावे. आधी प्रेरणामंत्र म्हणायचे नंतर एक भगवा ध्वज तो पुढे चालणारा एक जण हातात धरेल . त्याच्या मागे सर्वजण आई जगदंबेचा, भवानी मातेचा, श्री शिवरायांचा, हिंदू धर्माचा जयजयकार करत. ''मुखाने मराठा म्हणावे, जधीं दाटतो, धर्मासाठी झुंझायचं रं'' असे श्लोक, गीत गात विभागातील नवरात्रौत्सव मंडळांना भेट द्यायची. तेथे गणपती आणि देवीची आरती घेऊन पुन्हा मूळ ठिकाणी यायचं. ध्येयमंत्र म्हणून दौड संपते

श्री दुर्गामाता दौडची सुरुवात ३५ वर्षांपूर्वी सांगलीमधून श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक आदरणीय संभाजीराव भिडे गुरुजी यांच्या संकल्पनेतुन झाली आणि आपल्या पनवेल तालुक्यात २०१६पासून ही दुर्गामाता दौड घेण्यात येत आहे त्यामागचा उद्देश हेतू स्पष्ट आहे की, आपला भटकटत चाललेल्या हिंदू समाजाला आणि नवंतरुणांना शिवछत्रपती, शंभूछत्रपती यांच्या विचारांचा त्यांच्याच ध्येयधोरणांचा मार्गावर आणण्यासाठी श्री दुर्गामाता दौड म्हणजेच राष्ट्रीय नवरात्रोत्सव हा उपक्रम फक्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच नसून अखंड हिंदू समाजाचा आहे. शिवछत्रपतींना शंभूछत्रपतींना आदर्श माननाऱ्यांचा आहे आणि हा उपक्रम आता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात तर होतोच शिवाय तालुक्यामध्येसुद्धा होतोय. महाराष्ट्राच्या बाहेरसुद्धा होतोय ज्या ज्या ठिकाणी आशा प्रकारची श्री दुर्गामाता दौड होते, त्या त्या ठिकाणी आपण सहभागी झाले पाहिजे.

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : दसऱ्यानिमित्त पनवेलच्या मुख्य बाजरपेठेसह ठिकठिकाणी झेंडूची फुले, हार विक्रीसाठी उपलब्ध झाले होते. त्याची खरेदी करण्यासाठी नागरिकांची झुंबड उडाल्याचे दिसून आले. त्याचप्रमाणे दसऱ्याला वाटण्यात येणारी आपट्याची पानेदेखील बाजारात विक्रीसाठी दाखल झाली होती. पावसामुळे झेंडूच्या उत्पादनाचेही नुकसान झाले. त्याप्रमाणे आवक कमी असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. तरीही खरेदीसाठी नागरिकांचा उत्साह होता.**

## आरोग्य प्रहर

# नारळ पाणी पिताना 'या' लोकांनी काळजी घ्यावी

नारळ पाणी प्राकृतिकरित्या थंड पेय आहे. नारळ पाणी प्यायल्यामुळे तुमची तहान भागण्यासोबत त्या नारळातील पोषक तत्वांमुळे शरीराला फायदादेखील होतो. उन्हाळ्याच्या दिवसात उष्णतेमुळे गरम झालेल्या शरीराला आतून गार ठेवण्यासाठी नारळ पाणी प्यायचा सल्ला सगळेच देत असतात, तसेच हे प्यायल्यामुळे शरीरातील उष्णता कमी होऊन शरीरातील काही अंतर्गत त्रास नाहीसे होतात, पण नारळ पाणी पिण्याचे जसे फायदे आहेत, परंतु काही लोक असेही आहेत ज्यांना नारळ पाणी प्यायल्यानंतर त्रासही होऊ शकतो. जाणून घेऊया नारळाचे पाणी कोणासाठी त्रासदायक ठरतं...



**इलेक्ट्रोलाइट असंतुलन** : नारळ पाणी प्यायल्याने इलेक्ट्रोलाइट असंतुलन होऊ शकते. त्यामुळे ज्या लोकांना जास्त पोटॅशियमची समस्या आहे, त्यांनी हे नारळ पाणी पिण्यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. वास्तविक, नारळाच्या पाण्यात पोटॅशियमचे प्रमाण इलेक्ट्रोलाइट्सपेक्षा जास्त असते, त्यामुळे ते जास्त प्रमाणात सेवन केल्यास पोटॅशियमची पातळी झपाट्याने वाढते आणि पक्षाघाताचा धोका वाढू शकतो.

**कमी रक्तदाब** : नारळ पाण्याच्या सेवनाने रक्तदाब कमी होतो. अशा परिस्थितीत ज्या लोकांना कमी रक्तदाबाची समस्या आहे, त्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानंतरच नारळ पाण्याचे सेवन करावे.

**वजन वाढणे** : नारळाच्या पाण्यात कॅलरीज जास्त असतात. अशा परिस्थितीत जर तुम्ही नारळाचे पाणी जास्त प्रमाणात सेवन केले तर त्यामुळे शरीरातील कॅलरीज वाढतील आणि तुमचे वजनही वाढेल.

**सिस्टिक फायब्रोसिस** : सिस्टिक फायब्रोसिस ही एक अनुवांशिक स्थिती आहे, जी शरीरातील मिठाची पातळी कमी करू शकते. नारळ पाण्यात खूप कमी सोडियम आणि भरपूर पोटॅशियम असते. अशा परिस्थितीत जर तुम्हाला सिस्टिक फायब्रोसिसचा त्रास असेल तर मिठाची पातळी वाढवण्यासाठी नारळ पाणी पिऊ नका.

**मूत्रपिंड समस्या** : नारळ पाण्यात भरपूर पोटॅशियम असते, ज्यामुळे किडनीवर परिणाम होतो. अशा परिस्थितीत जर तुम्हाला आधीच किडनीची समस्या असेल तर तुमच्या डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नारळ पाण्याचे सेवन करा.

# आमदार प्रशांत ठाकूर यांची बीड खुर्द गावाला भेट



## नवरात्रोत्सवानिमित्त घेतले देवीचे दर्शन

**खोपोली, खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंगळवारी (दि. ४) खालापूर तालुक्यातील बीड खुर्द गावाला भेट दिली. तेथे नवरात्रोत्सव कमिटीतर्फे लवेश कर्णूक यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व स्मृतिचिन्हे देऊन सत्कार केला.

आमदार ठाकूर यांनी प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. आमदार ठाकूर यांच्या आगमनाने स्थानिक भाजप कार्यकर्त्यात उत्साह संचारला, त्यांनी कार्यकर्त्यांशी सवांद साधून पुढील रणनीतीबाबतही चर्चा केली.

भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठलराव मोरे, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, जिल्हा कोषाध्यक्ष सनी यादव, ॲड. राजेंद्र येरुणकर, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनीताई पाटील, युवा मोर्चाचे खालापूर तालुका अध्यक्ष प्रसाद पाटील, कर्जत तालुका अध्यक्ष प्रमोद पाटील, बीडखुर्दचे लवेश कर्णूक, जगदीश आगिवले, मोतीराम कर्णूक, खोपोली कामगार आघाडीचे अध्यक्ष अनिल कर्णूक, बबन चोरगे, राकेश कर्णूक, सचिन कर्णूक, दीपक कर्णूक, हरेश चंदन, राजेश कर्णूक, पंकज पाटील त्याच्यासह ओम साईराज मित्र मंडळाचे सर्व सदस्य व ग्रामस्थ या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज ठाकरे सपत्नीक कुलदैवत कोंडजाई देवीच्या चरणी नतमस्तक

## श्री बल्लाळेश्वराचेही घेतले दर्शन



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात ठाकरे घराण्याचे कुलदैवत असलेल्या कोंडजाई देवीचे मंदिर आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मंगळवारी (दि. ४) सपत्नीक कोंडजाई देवीची खणा नारळाने ओटी भरून आरती व पूजा केली. या वेळी ठाकरे यांनी पालीतील श्री बल्लाळेश्वराचेही दर्शन घेतले.

राज ठाकरे हे पत्नी शर्मिला ठाकरे यांच्यासह मंगळवारी कोंडजाई देवीचे दर्शन घेण्यासाठी आले होते. त्यांनी श्री बल्लाळेश्वराचेही दर्शन घेतले. त्यांच्या समवेत मनसे नेते बाळा नांदगावकर, शोभा देशपांडे, सचिन मोरे, गोवर्धन पोलसानी, जितेंद्र पाटील, देवेंद्र गायकवाड, लताताई कळंबे, सुनिल साठे, संजीवनी अजय अधिकारी, हरिचंद्र तेलंगे, संदीप ठाकूर, रूपेश पाटील, पवित्र पोलसानी, साईनाथ धुळे, दिपश्री घासे, अजय अधिकारी, भावेश बेलोसे, सचिन झुंजारराव आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

पालीत राज ठाकरे यांचे घोषणा, फटाक्यांची आतिषबाजीत स्वागत करण्यात आले. त्यांना भेटण्यासाठी व बोलण्यासाठी बल्लाळेश्वर मंदिर परिसरात चाहत्यांची मोठी गर्दी उसळली होती. ठाकरे यांनीही कार्यकर्त्यांशी मनमोकळेपणे व आपुलकीने संवाद साधला.



# कर्जतकरांनी केली जीवनवाहिनीची पूजा

**कर्जत : प्रतिनिधी**

येथून नियमित लोकलने मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांनी दसऱ्यानिमित्त आपल्या जीवनवाहिनी (लोकल) ची मंगळवारी (दि. ४) सकाळी पूजा केली.



या वेळी त्यांनी लोकलचे मोटरमन आणि गार्ड यांचा सत्कारही केला.

दररोज इच्छित स्थळी वेळेवर व न चुकता पोहोचविणाऱ्या प्रवाशांची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकल गाड्यांची पूजा गेल्या अनेक वर्षांपासून कर्जतकर दसऱ्याच्या आदल्या दिवशी करतात. कर्जतहून सकाळी ७ वाजून ५२ मिनिटांनी सुटणाऱ्या लोकलचे प्रवासी फारच हौसी, त्यांनी मंगळवारी आपापले डबे सजविलेच शिवाय लोकलच्या पहिल्या डब्याचा पुढचा भागही सजविला होता. या लोकलचे मोटरमन विजय सिंग आणि गार्ड श्रीकांत जाधव यांचा सत्कार असिफ मिर्झा यांनी शाल व श्रीफळ देवून सत्कार केला. या गाडीने बदलापूरहून पहिल्या वर्गाच्या डब्यातून नेहमी प्रवास करणारे अभिनय चव्हाण, हर्षल पोतदार हे याच गाडीत बसून कर्जतपर्यंत डबा सजवित आले आणि नंतर मुंबईकडे मार्गस्थ झाले. हर्षा राठोड व नूतन खोब्रागडे यांनीही डब्याचा सजावटीत सहभाग होता.

कैलास कांबरे, संकेत देशपांडे, आशिष प्रकाश, सचिन पाटील, डॉ. समता गाडे, अर्चना चव्हाण, संजीव पराशर, संगीता पोतदार, सरिता गोरे, पूनम पाटील, विनोद देशमुख, राजेश, दत्ता शेकडे, सूरज तरे, किशोर चव्हाण, प्रवीण मिश्रा, सुमित मुंढे, नितीन मोरे, सिद्धाराम मोगे, दत्ता शेकटे, कैलास शेलार, महेंद्र तवळे आदी प्रवासी या वेळी उपस्थित होते. काही प्रवासी निवृत्त झाले तरीही ते जीवनवाहिनीच्या पूजेसाठी मंगळवारी सकाळी आवर्जून उपस्थित होते.

# शाळा, रुग्णालय परिसरात हॉर्न वाजविण्यास बंदी

## खोपोली लायन्स क्लबने लावले फलक

**खोपोली : प्रतिनिधी**

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी शाळा, महाविद्यालय तसेच नगरपालिकेचे रुग्णालय आहे. येथील रस्त्यावर विनाकारण वाहनांचे हॉर्न वाजविल्यामुळे विद्यार्थी, रुग्णांचे लक्ष विचलत होते. तसेच ध्वनी प्रदुषणाचा त्रास होत असल्यामुळे लायन्स क्लब ऑफ खोपोलीने या परिसरात नगरपालिका, पोलीस ठाण्याच्या सहकार्यातून हॉर्न वाजण्यास बंदी असे फलक लावले आहेत.



लायन्स क्लब ऑफ खोपोलीच्या माध्यमातून गेली ५१वर्ष शहरात सातत्यपूर्ण नवनवीन उपक्रम राबवले जातात.क्लबने सामाजिक बांधिलकी जपत खोपोली शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, जनता विद्यालय, के. एम. सी. कॉलेज समोरील रास्ता, हस्तीलाल मॉल, शिळफाटा या ठिकाणी शांतता राखण्यासाठी व ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी फलक लावले. खोपोली पोलीस ठाण्याचे निरीक्षक शिरीष पवार यांच्या उपस्थित या फलकांचे अनावरण करण्यात आले. लायन्स क्लब ऑफ खोपोलीच्या अध्यक्षा शिल्पा मोदी, सेक्रेटरी संगीता पिल्ले, प्रोजेक्ट प्रमुख विकास नाईक, सदस्य अनुराधा कट्टी, स्वाती नाईक, रमेश पाटील, जितेंद्र परदेशी, अजय पिल्ले, अतिफ खोत, अल्पेश शहा, सचिन बोराना, शैला मेहता, प्रदिप मेहता, पल्लवी पडवळकर, सुजित पडवळर, पंकज मेहता या वेळी उपस्थित होते.

# सेवा पंधरवड्यात रायगडमध्ये ७९ टक्के प्रकरणांचा निपटारा

**अलिबाग : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवस (१७ सप्टेंबर) ते महात्मा गांधी जयंती (२ ऑक्टोबर) या कालावधीत राज्यात राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा राबविण्यात आला. त्यात रायगड जिल्ह्यातील प्रलंबित ७९ टक्के प्रकरणांचा निपटारा करण्यात आला, अशी माहिती सामान्य प्रशासन विभागाचे तहसीलदार विशाल दौंडकर यांनी दिली.

नागरिकांची खोळंबलेली कामे मार्गी लागावी या हेतुने सेवा पंधरवडा राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत रायगड जिल्ह्यातील ६९ हजार १३४ पैकी ५४ हजार ८११ प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आली. हे प्रमाण एकूण प्रलंबित प्रकरणांच्या ७९ टक्के आहे.

दिव्यांगाना प्रमाणपत्रांचे वाटप आणि पंतप्रधान किसान सन्मान निधीची कामांचा अपवाद वगळता इतर सर्व प्रलंबित प्रकरणे निकालात काढण्यात आली आहेत. जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या १६ हजार ११३ शेतकऱ्यांना या कालावधीत नवीन शासन निर्णयानुसार तीन कोटी ६३ लाख रुपयांच्या मदतनिधीचे वाटप करण्यात आले. जिल्ह्यातील ५७४ जणांनी शिधापत्रिका मिळण्याबाबत अर्ज केले होते, ते सर्व निकाली काढून सर्वांना शिधापत्रिका देण्यात आल्या. ४५७६ जणांनी विवाह नोंदणीसाठी अर्ज केले होते. त्यापैकी चार हजार ४४८ जणांची नोंदणी या कालावधीत करण्यात आली. मालमत्ता हस्तांतरणासाठी ४५५ अर्ज आले होते. ते सर्व अर्ज निकाली काढण्यात आले. विद्युत जोडणीसाठी ५०९८ अर्ज आले होते. त्या सर्वांना विद्यूत जोडणी देण्यात आली. मालमत्ता हस्तांतरणानंतर नवीन मालमत्ता धारकांची नावे चढवण्यासाठी आलेले सर्व अर्ज मंजूर करण्यात आले. अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना वनहक्क पट्टे मंजूर करण्यासाठी दाखल १४ अर्ज निकाली काढण्यात आले. ४०३ जणांना नॉन क्रमिलेअर दाखले देण्यात आले. १०२१ जणांनी नळपाणी जोडणीसाठी अर्ज केले होते. यापैकी ९७१ जणांना नवीन जोडणी देण्यात आली.

फेरफार नोंद, किसान सन्मान निधी, आणि दिव्यांग प्रमाणपत्र वाटपाच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा या कालावधीत होऊ शकलेला नाही. फेरफार नोंदणीची सात हजार ४१५ प्रकरणे प्रलंबित होती. यापैकी पाच हजार ४२६ प्रकरणे निकाली काढण्यात आली. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजने अंतर्गत १२ हजार ४३५ जणांनी प्रस्ताव दाखल केले होते. यापैकी पाच हजार ४७० प्रकरणे मंजूर करण्यात आली. तर पाच हजार ८८७ दिव्यांगांनी प्रमाणपत्रासाठी अर्ज केले होते. यापैकी केवळ ४०३ प्रकरणे मंजूर होऊ शकली आहेत. ही सर्व रखडलेली कामे यापुढील काळात मार्गी लावण्याचा प्रयत्न असल्याचे सामान्य प्रशासन विभागाचे तहसीलदार विशाल दौंडकर यांनी सांगितले

# अलिबागमध्ये रविवारी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या गीतांवर आधारित कार्यक्रम



**अलिबाग : प्रतिनिधी**

संस्कार भारती उत्तर रायगड जिल्हा समिती तर्फे रविवारी (दि. ९) सायंकाळी ४.३० वाजता चेंढरे-अलिबाग येथील भाग्यलक्ष्मी हॉलमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कवितांवर आधारित 'हे मातृभूमी तुजला...' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी रचलेल्या गीतांचे सादरीकरण व त्याचा भावार्थ समजण्यासाठी सुबोध निरूपण या संकल्पनेतून संस्कार भारतीतर्फे हे मातृभूमी तुजला हा कार्यक्रम सादर करण्यात येत आहे. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायिका मुग्धा वैशंपायन आणि प्रणय पवार गीतांचे सादरीकरण करणार आहेत. तर गीतांचे निरूपण सुप्रसिद्ध व्याख्याते पार्थ बावस्कर हे करतील. कोजागिरी पोर्णिमेच्या रम्य संध्याकाळी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अविट काव्य प्रतिभेचा रसास्वाद या कार्यक्रमाच्या औचित्याने रसिक प्रेक्षकांना घेता येईल. या कार्यक्रमाला रसिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन संस्कार भारती उत्तर रायगड समिती तर्फे मंत्री ॲड. जयंत चेउलकर आणि अलिबाग तालुका संयोजिका डॉ. विशाखा मोडक यांनी केले आहे.

# जिते गावात रक्तदान शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ जवळील जिते गावातील शिवस्वराज्य बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला. डोंबिवली येथील प्लाझ्मा ब्लड बँकेकडून रक्त संकलन करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष अक्षय सुभाष जाधव, सचिव विकास शेळके, खजिनदार निलेश घरत, ग्रामपंचायत सदस्य वांगडाना हजारे, चिंतामणी भोईर, योगेश जाधव यांच्यासह ग्रामस्थ या वळी उपस्थिती होते. उत्तम पालांडे, रवी निमसे आणि रंजना धुळे यांचे या रक्तदान शिबिरासाठी विशेष सहकार्य मिळाले.





**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां.विभाग, पनवेल**
**पिनकोड - ४१० २०६**
**E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in**
**दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०**

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ३२ (ई-निविदा) सन २०२२-२३**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२- २७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www. mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण ०४ कामे समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन ।दिनांक ०६.१०.२०२२ सकाळी १०.०० ते दिनांक २०.१०.२०२२ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदाजा.क्र./सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक :

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**



महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: सीएमए-०४२१/प्र.क्र.०१/२०२१/जाहिरात दिनांक: ०३ ऑक्टोबर, २०२२

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत खालील संवर्गातील पद भरतीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत:-

| जाहिरात क्रमांक | संवर्ग | एकूण पदसंख्या |
|---|---|---|
| ०८६/२०२२ | सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०२२ | ०६६ |
| ०८७/२०२२ | महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२२ | ३७८ |

२. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरावयाच्या पदांचा संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, प्रवर्गनिहाय तपशील, आवश्यक अर्हता, वयोमर्यादा, आरक्षण, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे तसेच सविस्तर जाहिरातीचे कृपया अवलोकन करावे.

३.ऑनलाईन अर्ज https://mpsconline.gov.in या संकेतस्थळाद्वारे जाहिरात क्रमांक ०८६/२०२२ करीता दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ तसेच जाहिरात क्रमांक ०८७/२०२२ करीता दिनांक २३ ऑक्टोबर, २०२२ पर्यंत सादर करणे आवश्यक राहील.

४. आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

ठिकाण : मुंबई. सह सचिव (जाहिरात), महाराष्ट्र लोकसेवा आयोग.



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेले असेसमेंट मधील मिळकती **१. सदाशिव आंबो माळी, २. सौ. सुरेखा सदाशिव माळी, ३. श्री. पांडुरंग शांताराम माळी, ४. श्री. उत्तम शांताराम माळी, ५. श्री. वामन आंबो माळी, ६. सौ. उमाबाई वामन माळी, ७. श्री. योगेश पांडुरंग वाघमारे, ८. सौ. योगीता योगेश वाघमारे, ९. सौ. प्रियंका पुरूषोत्तम मेराशी, १०. श्री. गंगाराम रामा राऊत, ११. सौ. वनिता गंगाराम राऊत** यांचे मालकीहक्काची, ताबेकब्जातील घरमिळकतीचे असेसमेंट असून सदरच्या घरमिळकती आमचे अशिल **श्री. तेजस मनजी पटेल** यांनी विकसनासाठी घेतलेले आहे. तरी सदर सर्व घरमिळकतीचे असेसमेंटचे विकसन करारनामा करण्याचे आहेत. परिशिष्टात वर्णनात नमुद केलेल्या घरमिळकतीचे विकसन करारनामा करणार असल्याने या कारणासाठी जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

| अ.क्र. | घर मालकाचे नांव | घर क्र. | क्षेत्र चौ.मी |
|---|---|---|---|
| १. | १. सदाशिव आंबो माळी,<br>२ सौ. सुरेखा सदाशिव माळी | २४५/२ | २७.८८१०४ |
| २. | १. श्री. पांडुरंग शांताराम माळी,<br>२. श्री. उत्तम शांताराम माळी. | २४६<br>२२४<br>२४७ | १८.५८७३६<br>५५.७६२०८<br>३७१.७४७२ |
| ३. | १. श्री. वामन आंबो माळी,<br>२. सौ. उमाबाई वामन माळी | २४५/५ | १८.५८७३६ |
| ४. | १. श्री. गंगाराम रामा राऊत,<br>२. सौ. वनिता गंगाराम राऊत | २२५/१<br>२२५/२ | ७५.७४३४९<br>७५.७४३४९ |
| ५. | सौ. प्रियंका पुरूषोत्तम मेराशी | २४४ | ४४.७०२६ |
| ६. | १ श्री. योगेश पांडुरंग वाघमारे,<br>२. सौ. योगीता योगेश वाघमारे | २४८ | ७५.७३६४३ |

प्राप्त परिस्थिती वरील परिशिष्टात नमुद असेसमेंट वर्णन केलेले घरमिळकती वा कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्तीचे व्यवहार करारमदार, वहिवाट, ताबाकब्जा, मृत्यूपत्रांकित दान, बक्षिस, फरोक्त, भाडेपट्टा, चार्ज, लिअन वगैरे इतर हक्क हितसंबंध असल्यास सबळ पुराव्याचे कागदपत्रे हरकती १५ दिवसाचे मुदतीत लेखी हरकती कळवावेत.

वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध निर्विधात आहे असे गृहीत धरून विकसन करारनामा करण्यात येईल मागावून येणारी हरकत, तक्रार वगैरे बंधनकारक राहणार नाही असे आमचे अशिलांमार्फत सुचविण्यांत येत आहे याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०४/१०/२०२२
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**ॲड. कांचन एस. पाटील**
बी.ए.एलएल.बी.

**पत्ता :-** ऑफिस नं २०१, दुसरा मजला, साई आर्केड, जी.पी. पारसिक बँकेवरती लाईफ लाईन हॉस्पीटल जवळ पनवेल बस स्टॅन्ड समोर, पनवेल जि. रायगड ४१० २०६.
फोन : ८६८९८०९८९६ / ८१०८८८२६११

# कसळखंड परिसरात 'सीसीटीव्ही'ची नजर

## गावातही कॅमेरे असणे गरजेचे -पोलीस उपायुक्त शिवराज पाटील

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील कसळखंड ग्रुप ग्रामपंचायतीच्या अंतर्गत कसळखंड, आष्टे, शिवाजीनगर, फणसवाडी आणि अरीवली अशी एकूण पाच गावे येतात. या पाचही गावात प्रत्येकी तीन कॅमेरे याप्रमाणे एकूण १५ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या सीसीटीव्हींचा लोकार्पण कार्यक्रम सोमवारी (दि. ३) झाला. या वेळी नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी गावात सीसीटीव्ही कॅमेरे असणे गरजेचे आहे, असे असे प्रतिपादन परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी केले.



सीसीटीव्हीमुळे गुन्हेगारीला आळा बसतो. त्याचबरोबर गुन्ह्यांची उकल करण्यासाठी पोलीस प्रशासनाला मदत मिळते. त्यामुळे परिमंडळ २ हद्दीतील सर्व ग्रामपंचायतींना आवाहन करण्यात येते की गावाच्या परिसरातील जास्तीत जास्त ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. जेणेकरून परिसरातील नागरिक सुरक्षित राहतील आणि गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण वाढेल, त्याचबरोबर गुन्ह्याला प्रतिबंध होईल, असेही पाटील यांनी या वेळी सांगितले.

पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी सर्व ग्रामपंचायतीचे सरपंच आणि उपसरपंच यांना आदेशित केले होते की तुमच्या गावाच्या हद्दीतील येणाऱ्या जाणाऱ्या मार्गावर, धार्मिक स्थळांवर किंवा महापुरुषांच्या पुतळ्याजवळ सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घ्यावेत. जेणेकरून गावातील जनतेचे आणि त्यांच्या मालमत्तेचे तसेच महापुरुषांच्या पुतळ्याचे संरक्षण करणे सोपे होईल. या अनुषंगाने बहुतांश ग्रामपंचायतींनी याबाबत पूर्तता केली होती.

कसळखंड ग्रामपंचायीच्या सरपंच माधुरी पाटील व उपसरपंच मोनिका पाटील आणि सर्व सदस्यांनी स्वतःच्या निधीतून हे कामकाज यशस्वीरीत्या पूर्ण केले. या अनुषंगाने पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांच्या हस्ते व सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनवणे, पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या वेळी ग्रुप ग्रामपंचायत कसळखंड सरपंच माधुरी अनिल पाटील, उपसरपंच मोनिका महादेव पाटील, सदस्य राजेश्री रवींद्र घरत, माजी उपसरपंच महेंद्र गोजे, रंजना राम नाईक, माजी सरपंच राम गोजे, शिवाजी माळी, जयवंत पाटील, पोलीस पंढरीनाथ गाढे, प्रगतशील शेतकरी कमलाकर घरत, पोलीस पाटील प्रवीण पाटील, हरिभाऊ पाटील, अनंत पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष वसंत पाटील, भाताण सदस्य तानाजी पाटील, पोयंजे विभाग अध्यक्ष प्रवीण ठाकूर, सावळा सदस्य सुनील माळी, रमेश पाटील, शांताराम पाटीलव ग्रुप ग्रामपंचायत कसळखंड हद्दीतील ग्रामस्थ मंडळ उपस्थित होते.

या वेळी सीसीटीव्ही कॅमेराचे फायदे आणि तोटे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी गावकऱ्यांना समजावून सांगितले. ज्या गावात सीसीटीव्ही असतात त्याठिकाणी गुन्हेगारीचे प्रमाण कमी असते तसेच गुन्हा घडल्यास त्या दृष्टिकोनातून शोध घेणे पोलिसांना सोपे पडते. या अनुषंगाने उर्वरित ग्रामपंचायतींनी देखील आपल्या गावाच्या हद्दीत सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घ्यावेत. तसेच महापालिका व सिडको हद्दीत देखील सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घेण्यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा केला असल्याची माहिती पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी दिली.

> **पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकूण ८१ गावे असून ४३ ग्रामपंचायती आहेत. गावाचा परिसर सुरक्षित राहावा या दृष्टिकोनातून गावात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत असे पोलीस प्रशासनाकडून वेळोवेळी आवाहन करण्यात आले आहे. त्या दृष्टीने जवळपास २० ग्रामपंचायतींनी गावात सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत.**
>
> **-रवींद्र दौंडकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल तालुका**







**पनवेल : भाजप तालुकाध्यक्ष अरुणेश भगत यांनी गव्हाण येथे आई एकविरा सेवा मंडळ तसेच गावदेवी नवरात्र मंडळाच्या वतीने आयोजित नवरात्रोत्सवास भेट देत देवीचे दर्शन घेतले. या वेळी विश्वनाथ कोळी, जयवंत देशमुख, नंदा कोळी, सुनील कोळी, रणधीर कोळी, अशोक कडू, श्रीकांत देशमुख, शाम ठाकूर, रमेश ठाकूर, विष्णू तांडेल, रामनाथ तांडेल, महेंद्र पाटील, एकनाथ पाटील, गजानन कोळी, नामदेव पाटील, अरुण कोळी आदी उपस्थित होते.**




**नवी मुंबई महापालिकेच्या बेलापूर मुख्यालयातील आरोग्य विभाग कर्मचारी**



**पनवेल महापालिका कर्मचारी**



**नवी मुंबई महापालिकेच्या बेलापूरमधील मुख्यालयातील कर्मचारी**



**पनवेल : भाजप रायगड जिल्हा ओबीसी अध्यक्ष एकनाथ देशेकर, लक्ष्मण पाटील, भाऊ शाटे आदींनी कोंडपवाडी आदिवासी येथील देवीचे दर्शन घेतले.**






**दुर्गामाता दौड (माळ नववी) पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पनवेल विभागाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दुर्गामाता दौडचे नऊ दिवस आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक उपक्रमाची नववी माळ मंगळवारी नवीन पनवेल येथे गुंफण्यात आली. दौड बी-१० पासून सुरू करण्यात आली. त्यानंतर सेक्टर १२, १३ तसेच ए टाईप इ-१ मधून, पनवेल स्टेशन, पोदी असे मार्गक्रमण करून पुन्हा सुरुवातीच्या ठिकाणी सांगता करण्यात आली या दौडला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**

## कर्मवीर जयंती सभा

**उरण :** रयत शिक्षण संस्थेचे, तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे आणि वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. ३० सप्टेंबर) पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त सभेचा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे 'रयत'चे माजी सचिव, प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव, उपाध्यक्ष पी. जे. पाटील, श्री. सोलनकर, उरण पं. स. सदस्य दीपक ठाकूर, विद्यालयाचे चेअरमन कृष्णा कडू, प्राचार्य डॉ. पी. जी. पवार, माध्यमिक विभागाच्या प्राचार्या सौ. वर्तक, उपमुख्याध्यापक श्री. म्हात्रे, पर्यवेक्षक श्री. म्हात्रे, सर्व स्कूल कमिटी सदस्य ,कार्यालय प्रमुख श्री. तुमडे आदींच्या हस्ते कर्मवीर अण्णा आणि वीर वाजेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

नचिकेत म्हात्रे, मंदार म्हात्रे आदींनी इशस्तवन, रयत गीत आणि स्वागतगीत सादर केले. गुणवंत विद्यार्थी यांचे पारितोषिक देऊन कौतुक करण्यात आले. स्नेहल शिंदे हिने भाषणातून कर्मवीर अण्णांची महती सांगितली. सूत्रसंचालन दर्शना माळी, दिनेश सासवडे यांनी केले तर आभार एस. डी. म्हात्रे यांनी मानले.






# पालीचे डम्पिंग ग्राउंड समस्यांच्या गर्तेत

## कचरा रस्त्यावर, नागरिकांचे आरोग्य धोक्यात



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पाली शहरातील कित्येक टन कचरा येथील टेंबी वसाहती जवळील डम्पिंग ग्राऊंडमध्ये टाकला जातो. मात्र संरक्षक भिंत नसल्याने हा कचरा मुख्य रस्त्यावर येऊन नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शिवाय इतरही अनेक समस्यांनी या डम्पिंग ग्राऊंडला घेरले आहे.

डम्पिंग ग्राऊंडच्या आजूबाजूला वसाहती आहेत. आयटीआय व महावितरणचे सबस्टेशन आहे. मढाळी व शिळोशी गावांना जाण्याचा हा मुख्य रस्ता आहे. रस्त्यालगत असलेल्या या डम्पिंग ग्राऊंडवरील कचरा पूर्णपणे रस्त्यावर आल्याने व दुर्गंधीमुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तेथून जाणाऱ्या नागरिकांना नाकदाबून ये-जा करावी लागत आहे.

फेब्रुवारी महिन्यात पाली ग्रामपंचायतीची नगरपंचायत झाली, मात्र अजूनही घनकचरा व्यवस्थापनचा प्रश्न अद्याप काही सुटला नाही. डम्पिंग ग्राऊंडवर असलेल्या कचऱ्यामध्ये अधिक प्रमाणात प्लॉस्टिकयुक्त कचरा असतो. संरक्षण भिंत नसल्याने मोकाट गुरे, कुत्रे तेथे येऊन प्लास्टिकमधील अन्नपदार्थ कचऱ्यासह खातात. त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येत असून अनेक जनावरेदेखील दगावली आहेत. येथील कचरा थेट जाळला जातो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होऊन पर्यावरण व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.



**नगरपंचायत कर्मचारी कचरा डम्पिंग ग्राऊंडमध्ये न टाकता रस्त्याच्या बाजूला टाकतात. हा कचरा रस्त्यावर आल्याने दुर्गंधी व घाणीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पाली नगरपंचायतीने या डम्पिंग ग्राऊंडला संरक्षक भिंत घालावी, जेणेकरून जनावरे आत जाणार नाहीत आणि कचरासुद्धा बाहेर येणार नाही.**

**-संजय घोसाळकर, सामाजिक कार्यकर्ते, पाली, ता. सुधागड**

**डम्पिंग ग्राऊंड व त्या बाहेर येणाऱ्या कचऱ्या संदर्भात लवकरच योग्य उपयोजना करण्यात येईल. याबाबत कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. येथील कचऱ्याचा नागरिकांना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही याची खबरदारी घेत आहोत.**

**-आरिफ मणियार, उपनगराध्यक्ष, पाली नगरपंचायत**

# ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना

**अलिबाग : जिमाका**

ओबीसी महामंडळाकडून समाजातील ओबीसी विद्यार्थ्यांकरिता शासनाने राज्यांतर्गत, देशांतर्गत शिक्षणासाठी १० लाख व परदेशात शिक्षणासाठी २० लाख रुपये मर्यादेत कर्ज सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या योजनेमध्ये उमेदवाराला बँकेकडील भरलेल्या व्याजाच्या १२ टक्केपर्यंत परतावा मिळणार आहे. या शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजनेचा ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या योजनेच्या लाभाकरिता उमेदवाराचे वय १७ ते ३० वर्ष असावे. रहिवासी दाखला, जातीचा दाखला, तहसीलदारांनी दिलेला कौटुंबिक उत्पन्नाचा दाखला, उमेदवार व त्याचे पालक यांचे आधारकार्ड, फोटो इत्यादी, आधार लिंक बचत खाते पासबुक, वयाचा पुरावा इत्यादि कागदपत्रे आवश्यक आहेत. ही योजना ऑनलाइन असून महामंडळाच्या www. msobcfdc.org या अधिकृत संकेतस्थळावरून अर्ज सादर करावेत.

शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत बँकेने उमेदवाराला वितरीत केलेल्या कर्ज रक्कमेवरील व्याजाची नियमित परतफेड केलेल्या उमेदवाराला केवळ व्याजाचा परतावा महामंडळ उमेदवाराच्या आधार लिंक बँक खात्यात वर्ग करेल. कर्ज परतफेडीचा कालावधी जास्तीत जास्त पाच वर्षे आहे.

ज्या पात्र उमेदवारांना या योजनेचा लाभ घ्यावयाचा असेल, त्यांनी महामंडळाच्या संकेतस्थळावरून अर्ज सादर करावेत तसेच अधिक माहितीकरिता जिल्हा व्यवस्थापक, शामराव पेजे कोकण इतर मागास आर्थिक विकास महामंडळ लिमिटेड किंवा ०२१४१-२२४४४८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन शामराव पेजे कोकण इतर मागास आर्थिक विकास महामंडळ लिमिटेडचे जिल्हा व्यवस्थापक निशिकांत नार्वेकर यांनी केले आहे.

# कालवण गावात वीज पडून घराचे नुकसान

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील कालवण गावातील रमेश चंद्रकांत लाडघरे यांच्या घरावर शुक्रवारी (दि. ३०) रात्री वीज पडून घराचे मोठे नुकसान झाले. तलाठ्याने या घराच्या नुकसानीचा पंचनामा केला, यावेळी पानसई ग्रामपंचायतीच्या सरपंच रुचिता धाडवे, ज्येष्ठ नेते भिकूशेठ धाडवे व ग्रामस्थ उपस्थित होते.

रमेश लाडघरे यांच्या कालवण गावातील घरावर शुक्रवारी रात्री वीज कोसळली. त्यामध्ये घराची कौले, सागवानी भाल, इलेट्रीक फिटिंग, ढापे यांचे नुकसान झाले. तसेच भिंतीला तडे जावून सुमारे ९६ हजार ३७५ रुपयांचे नुकसान झाले. या घरमालकाला तातडीने नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी पानसईच्या सरपंच रुचिता धाडवे यांनी केली आहे.



# तीनविरा येथे वन्यजीव बचाव कार्यशाळेस प्रतिसाद

**अलिबाग : जिमाका**

वन्यजीव सप्ताहाचे औचित्य साधून वाईल्ड लाईफ वॉरियर्स ऑफ अलिबाग आणि ऑर्गनायझेशन फॉर वाईल्ड लाईफ स्टडीज यांच्या संयुक्त विद्यमानाने तिनविरा येथील वनविभागाच्या केंद्रामध्ये डॉ. प्रसाद दाभोळकर यांच्याद्वारे अलिबाग तालुक्यातील वनरक्षकांसाठी साप आणि अन्य वन्यजीवांचे बचावकार्य कसे करावे याबाबतची कार्यशाळा घेण्यात आली.

वाईल्ड लाईफ वॉरियर्स ऑफ अलिबाग आणि ऑर्गनायझेशन फॉर वाईल्ड लाईफ स्टडीज या संस्था गेली अनेक वर्षे वन्यजीव बचाव आणि जनजागृतीसाठी कार्यरत आहेत. अलिबाग आणि परिसर हा नैसर्गिक जैवविविधतेने नटलेला आहे. त्यामुळे साप आणि अन्य वन्यप्राण्यांचा तेथे मोठ्या प्रमाणात वावर आढळतो. अशा वेळी मनुष्य-वन्यप्राणी हा संघर्ष स्वाभाविक आहे. अशा वेळी वनविभागाची भूमिका फार महत्वाची असते. म्हणूनच वनरक्षकांना बचावकार्याचे योग्य प्रशिक्षण देणे आवश्यक असते, जेणेकरुन वन्यजीवांचे संरक्षण होईल तसेच सामान्य नागरिकांमध्ये जनजागृती होईल, असे डॉ. प्रसाद दाभोळकर यांनी या वेळी सांगितले.



अलिबाग वनविभाग, वाईल्ड लाईफ वॉरियर्स ऑफ अलिबागचे अदिती सगर, ओमकार कामतेकर, पारस घरत, सुजित लाड, रुपेश गुरव, समीर पालकर आणि ऑर्गनायझेशन फॉर वाईल्ड लाईफ स्टडीजच्या सभासदांनी या कार्यशाळेसाठी विशेष मेहनत घेतली.

# पोषण माह अंतर्गत साळाव मराठी शाळेत कार्यक्रम

## समतोल आहार विषयावर डॉ. अंकित काटकर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील साळाव मराठी प्राथमिक शाळेत राष्ट्रीय पोषण माहअंतर्गत किशोरवयीन मुलींसाठी पोषण मूल्ये तर विद्यार्थ्यांसाठी समतोल आहार या विषयावर विशेष कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी डॉ. अंकित काटकर यांनी, समतोल आहाराचे महत्व, समतोल आहाराचे घटक जीवनसत्वे याबद्दल मुलांना मार्गदर्शन केले.



निरोगी जीवनशैली टिकवून ठेवण्यासाठी पौष्टिक, पूरक आणि संतुलित आहार महत्वाची भूमिका बजावते, असे मुख्याध्यापक चंद्रकांत काटकर यांनी प्रास्ताविकामध्ये सांगितले. मुलगी वयात येताना दिसून येणारे बदल, वयात येणाऱ्या मुलींनी कोणती काळजी घेतली पाहिजे, मुलींनी कोणत्या प्रकारचा आहार घेतला पाहिजे, याविषयी आरोग्य सेविका शिल्पा ठाकूर यांनी मार्गदर्शन केले.

गटशिक्षणाधिकारी बी. के. पाखरे व केंद्र प्रमुख मोहिनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आलेल्या या कार्यक्रमाला सरपंच नीलम पाटील, आरोग्य सेवक गणेश जैतू, सहशिक्षिका माधुरी कांबळी यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. रेश्मा धुमाळ यांनी आभार मानले.

# आमदार रविशेठ पाटील यांनी नवरात्रोत्सव मंडळांना भेट देऊन घेतले देवींचे दर्शन

**पेण : प्रतिनिधी**

आमदार रविशेठ पाटील यांनी भाजप पदाधिकाऱ्यांसह पेण शहरातील नवरात्रौत्सव मंडळांना भेट दिली व दुर्गा मातेचे दर्शन घेत मंडळांच्या पदाधिकारी व सदस्यांना दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या.



आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते आई कोंबडपाडा वासिनीचे पूजा करण्यात आली. त्यांचे माजी नगराध्यक्ष गुरुनाथ मांजरेकर यांनी शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून स्वागत केले तसेच माजी नगराध्यक्ष प्रीतम पाटील यांचे महिला मंडळ अध्यक्षा स्मिता गुरव व नगर परिषदेतील माजी गटनेते अनिरुध्द पाटील सर्व पदाधिकारी व कार्यकर्तेचे स्वागत करण्यात आले

यावेळी अजय क्षीरसागर, पेणचे माजी नगराध्यक्ष रघुनाथ बोरेकर, मितेश शहा, सचिन शिंगवण, माजी सभापती प्रकाश पाटील, माजी उपनगराध्यक्ष दिलीप लाड, संजय पाटील, हितेश पाटील, सुप्रिया चव्हाण, ज्योती म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थितीत होते.

# तेलवडे येथे रंगला शक्ती-तुरा नाचांचा सामना

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील तेलवडे येथील श्री हनुमान मित्र मंडळ व महालक्ष्मी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने व आमदार महेंद्र दळवी यांच्या सहकार्याने नवरात्रौत्सवा निमित्त शक्ती-तुरा नाचांचा सामना आयोजित करण्यात आला होता. माजी सरपंच विलास सुर्वे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

तेलवडे सरपंच प्रमोद तांबडकर, गाव अध्यक्ष कृष्णा म्हात्रे, उपाध्यक्ष काशिनाथ तांबडकर, सुपारी संघाचे चेअरमन महेश भगत, शाहीर तेजल पवार, शाहीर कवी वसंत भोईर, भरत बेलोसे, ऋषिकांत डोंगरीकर, संदिप पाटील, शुभांगी करडे, दिपेश म्हात्रे मनिषा भोपी, सरिता पाटील, वैष्णवी तांबडकर, अशोक धुमाळ, मनोज कमाने, रुपेश रणदिवे, मंदा ठाकूर, विनोद तांबडकर, किरण म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, केशव भोपी, कामिनी म्हात्रे, सिमा तांबडकर, दत्ता माळी आदिंसह श्री हनुमान मित्र मंडळ व महालक्ष्मी महिला मंडळाचे पदाधिकारी व प्रेक्षक उपस्थित होते.

शक्तीवाले शाहीर तेजल पवार (गोताड) आणि तुरेवाले शाहीर वसंत भोईर (देव कान्हे, रोहा) यांच्यामध्ये हा सामना रंगला. या मंडळांनी गण, गौळण तसेच महाभारत, रामायणकालीन दृष्टांतावर सवाल-जबाब सादर केले.



# अभिनेत्री मानसी नाईक जाधव व अमोल जाधव यांनी घेतले कोंबडपाडावासीनीचे दर्शन



**पेण : प्रतिनिधी**

अभिनेत्री मानसी नाईक आणि 'आई तुझा डोंगर' फेम गायक अमोल जाधव यांनी पेणमधील कोंबडपाडा नवरात्र उत्सव मंडळाला भेट देवून आई कोंबडपाडावासिनीचे दर्शन घेतले. या वेळी मानसी नाईक हिच्या हस्ते आई कोंबडपाडावासिनी मातेची पूजा व आरती करण्यात आली.

सोनाली पवार हिने अभिनेत्री मानसी नाईक यांचे तर गायक अमोल जाधव यांचे मंडळाकडून स्वागत करण्यात आले. या वेळी अमोल जाधव यांनी सादर केलेल्या गीतांनी सर्व उपस्थित नागरिक मंत्रमुग्ध झाले. महिला मंडळ अध्यक्षा स्मिता गुरव, माजी नगरसेविका भावना बांधणकर, जयंवत पवार, गणेश पवार यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वनदेवतेचे पूजन, आदिवासी स्त्रियांची ओटी भरून वन्यजीव सप्ताहास माणगावमध्ये सुरुवात

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील पन्हळघर बुद्रुक आदिवासी वाडीत माणगाव वन विभागातर्फे वनदेवतेची पूजा आणि स्थानिक महिलांची ओटी भरुन वन्यजीव सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. या वेळी उपस्थित आदिवासी महिलांनी नवरात्रौत्सवानिमित्त फेर धरून पारंपारिक नृत्ये सादर केली.

आदिवासी हा निसर्ग पूजक आणि जंगलाचे रक्षण करणारा समाज असल्याने वनविभाग आणि आदिवासी बांधवांमध्ये सहकार्याचा बंध वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने माणगाव वन परिक्षेत्रातर्फे सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वनरक्षक रूपाली पवार यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन वनरक्षक दीपक तेटगुरे यांनी केले.

माणगावचे वनक्षेत्रपाल अनिरुद्ध ढगे, शृंखला सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा अस्मिता शर्मा, पन्हळघर परिमंडळ अधिकारी सुजित राजमाने, वनरक्षक सुनीता वडजे, अनिल मोरे, अक्षय मोरे यांच्यासह इतर वन कर्मचाऱ्यांनी हा कार्यक्रम यशस्व करण्यासाठी परिश्रम घेतले.



# समाजोपयोगी सेवा पंधरवडा



पनवेल : देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती (१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर) हा सेवा पंधरवडा भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. यानिमित्त पनवेल परिसरात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजप जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते. यात पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांसोबतच नागरिकांनीही सहभागी होत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्याची ही चित्रझलक...





कामोठे येथे भाजप व आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालयात, खांदा कॉलनीत रोटरी ब्लड बँक या ठिकाणी आणि खारघर येथे रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये रक्तदान शिबिर घेण्यात आले.

पनवेल शहरातील नवनाथ मंदिर येथे मोफत आरोग्य, नेत्रतपासणी व चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याचा लाभ पाचशेहून अधिक जणांनी घेतला. नवीन पनवेल सेक्टर २ येथील कर्नाटक हॉलमध्येही मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.





देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कृतित्व, व्यक्तित्व व जनकल्याणकारी योजनांवर आधारित नमो प्रदर्शनी पनवेलमध्ये आयोजित करण्यात आली होती.





खारघर ग्रामविकास भवन परिसरात आणि खांदा कॉलनीत वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी सर्वांनी वृक्षारोपण करून झाडे लावा झाडे जगवा असा संदेश दिला तसेच वृक्षसंवर्धन करण्याबाबत जनजागृती केली.




पाणी हे जीवन आहे. त्यामुळे त्याची उपयुक्तता, बचत याबाबत जनजागृती व्हावी यासाठी पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, कळंबोली, कामोठे, खारघर, उलवे नोड या ठिकाणी जलसंवर्धन रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन पाण्याचे महत्त्व अधोरेखित केले.




सेवा पंधरवड्यानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ आणि भारतीय जनता पक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने १६ ऑक्टोबर रोजी खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार महाशिबिर आयोजित करण्यात आले आहे. या महाशिबिराच्या अनुषंगाने तालुक्यातील मोर्बे, गव्हाण आणि नेरे येथे प्राथमिक तपासणी शिबिर झाले.




देशाच्या विविधतेतील एकतेचे दर्शन घडविणारा लोककला व सांस्कृतिक महोत्सव पनवेलमध्ये रंगला. या मेळाव्यास खासदार गोपाळ शेट्टी, माजी मंत्री तथा सेवा पंधरवड्याचे प्रदेश संयोजक कृपाशंकर सिंह यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्याचप्रमाणे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



महिला मोर्चाच्या वतीने अंगणवाडी दत्तक व खाऊवाटप उपक्रम राबविण्यात आला.




पनवेल महापालिका क्षेत्रातील गृहनिर्माण संस्थांचे अध्यक्ष, सचिव व पदाधिकाऱ्यांसाठी रेनवॉटर हार्वेस्टिंगसंदर्भात बृहन्मुंबई महापालिकेच्या निवृत्त उपायुक्त सुप्रभा मराठे यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. त्यांनी रेनवॉटर हार्वेस्टिंग पद्धती समजावून सांगितली.




स्थानिक उत्पादने व व्यवसायांना प्रोत्साहन देण्यासाठी व्होकल फॉर लोकल शीर्षकाखाली वस्तूंचे प्रदर्शन गोखले सभागृहात तसेच मिडलक्लास हौसिंग सोसायटीमधील श्री गणेश मंदिर येथे भरविण्यात आले होते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com